पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

रविवार, दि. ०३ ऑगस्ट, २०२५ | वर्ष : १३ | अंक : २०८ | पाने ८ | किंमत २ रुपये

www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ अधिक मानवीय होण्यासाठी वाचन उपयुक्त

४ न्यायालयात वकिलाला मारहाण

५ सरकारी जागेवरील अतिक्रमण होणार नियमनुकूल



पान ८ वर..

## बाजारभाव - सोने

२२ कॅरेट : ९२,२२०/-

२४ कॅरेट : ९९,६५०/-

## बाजारभाव - चांदी


१ किग्रॅ. : १,०१,८००/-

# पुणे जिल्ह्यात दादागिरी वाढली, मग मुख्यमंत्री काय करतायत? : खा. सुप्रिया सुळे यांचा सवाल

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : राज्यात गुन्हेगारी वाढत असल्याबद्दल खासदार सुप्रिया सुळे यांनी पुन्हा एकदा शिंदे सरकारवर सडकून टीका केली आहे. पुणे, बीडसह दोन-तीन जिल्ह्यांमध्ये सातत्याने गुन्हे वाढत आहेत. पोलिस वर्दी ची भिती उरलेली नाही, लोकांना न्याय मिळत नाही. कोण आहे यामागे? याचा शोध घेण्याऐवजी सरकार मौन बाळगते,पुण्यात दादागिरी वाढली, मग मुख्यमंत्री काय करतायत? असा प्रश्न सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला.





दौंडमधील यवत गावात काल दोन गटांत निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर सुळे बोलत होत्या. सुळे म्हणाल्या की, दौंड एक सुसंस्कृत, शांतताप्रिय तालुका आहे. पण बाहेरून काही लोक येऊन इथे समाजात तेढ निर्माण करत असतील, तर त्यांना रोखा. पालकमंत्री अजितदादांना मी विनम्र विनंती करते. दौंडने तुम्हाला खूप प्रेम दिलं आहे. त्यामुळे दौंडमध्ये गडबड होणार नाही याची जबाबदारी तुमची आहे, असा इशारा त्यांनी दिला.

सुप्रिया सुळे पुढे बोलताना म्हणाल्या की, दौंडशी अनेक वर्षांपासून आमचे कौटुंबिक नातं आहे. काल स्थानिक आमदार राहुल कुल यांच्याशीही सविस्तर चर्चा झाली. राजकीय मतभेद असले तरी त्यांनी सहकार्याची भावना दाखवली, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, मुख्यमंत्री स्वतः म्हणतात पुण्यात दादागिरी वाढली आहे. त्यामुळे गुंतवणूक येत नाही. मग तुम्ही कारवाई का करत नाही? जबाबदारी कोणाची? असा थेट सवाल सुळे यांनी उपस्थित केला. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, ४९०० कोटींचा भ्रष्टाचार लाडकी बहिण योजनेत झाला आहे. एवढा मोठा जनादेश मिळाल्यानंतर हे सरकार गुन्हेगारांना पाठीशी घालत आहे. महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या करत आहे आणि इकडे मंत्री वाचाळपण करण्यात व्यस्त आहेत. हे सरकार देशातील सगळ्यात दुर्दैवी उदाहरण ठरत आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, बिहारमध्ये निवडणूक आयोग पारदर्शकपणे काम करत नाही. नाव कमी-जास्त करण्यात येत आहेत. हे सगळे संसदेच्या माध्यमातून चर्चेत आणावे, हीच सशक्त लोकशाही आहे. भारत हा संविधानाने चालतो, कुणाच्या मनमानीने नाही, असा स्पष्ट इशारा सुप्रिया सुळे यांनी दिला.

# यवतमध्ये तणावपूर्ण शांतता ; बाजारपेठ बंद; २० जणांना अटक

**जनप्रवास । प्रतिनिधी**

यवत : दौंड तालुक्यातील यवतमध्ये सध्या शांततेचं वातावरण आहे. काल घडलेल्या घटनेमुळे जनजीवन विस्कळीत झालं होतं. मात्र पोलिसांनी आता परिस्थिती आटोक्यात आणली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी कलम १४४ लागू केल्याने आजही यवतमधील सर्व दुकानं आणि व्यापार बंद आहेत. नागरिकांनी घोळक्याने उभे राहू नये, कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असं आवाहन पोलीस करत आहेत. यवतमधील शाळांना देखील सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

शुक्रवारी दंगल घडवणाऱ्या आरोपींची पोलिसांनी रात्रीपासूनच धरपकड सुरू केली आहे. शुक्रवारी सकाळी एका तरुणाने आक्षेपार्ह स्टेटस ठेवलं होतं. हे निमित्त साधून ही संपूर्ण शहरात दंगल झाल्याचं सांगितलं जात आहे. पोलिसांनी आत्तापर्यंत २० जणांना अटक केली असून अजूनही अनेक जणांचा शोध सुरू आहे.

दुसरीकडे, यवतमध्ये चार दिवसांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची विटंबना केल्याप्रकरणी तणाव निर्माण झाला होता. आरोपीला तात्काळ अटक केली.

त्यानंतर फेसबुकवर एक आक्षेपार्ह पोस्ट टाकल्याच्या कारणावरून पुन्हा तणाव निर्माण झाला आणि त्यानंतर शुक्रवारी थेट सकाळी बाजारपेठ बंद करण्यात आली. काही घरांना, बेकरी आणि धर्मस्थळांवर जमावाने हल्ला केला. यात काही दुकानं आणि घरांना आगी लावण्यात आल्या.

## संक्षिप्त

### पृथ्वीराज चव्हाण यांचे सनातनविरोधात वक्तव्य

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केलेल्या विधानाविरोधात शिंदेसेना आक्रमक झाली आहे. हिंदू धर्माचा अपमान केल्याचा आरोप करत एकनाथ शिंदे यांच्या कार्यकर्त्यांनी मुंबईतील काँग्रेसच्या टिळक भवनावर मोर्चा काढला. मात्र पोलिसांनी १०० मीटर अंतरावरच या कार्यकर्त्यांना रोखले. माजी खासदार राहुल शेवाळे, मनिषा कायंदे, शीतल म्हात्रे, शायना एन.सी यांच्यासह अनेक नेते कार्यकर्त्यांसह या मोर्चात सहभागी झाले. या मोर्चात काँग्रेसविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

याबाबत माजी खासदार राहुल शेवाळे म्हणाले की, मालेगाव बॉम्बस्फोटात कोर्टाने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. त्यावर प्रतिक्रिया देताना पृथ्वीराज चव्हाण यांनी हिंदू धर्माचा अपमान केला. हिंदू धर्माचा अपमान आम्ही सहन करणार नाही. वारंवार काँग्रेसकडून सनातन धर्माचा अपमान करणारी विधाने केली जातात. हिंदुत्वाबाबत आम्ही हे खपवून घेणार नाही असं त्यांनी सांगितले. तसेच काँग्रेस-राष्ट्रवादीने भगवा दहशतवाद शब्दाचा प्रयोग केला. तो कोर्टात खोटा ठरला. हिंदू दहशतवाद खोटे होते हे षड्यंत्र उघड झाले असं मनिषा कायंदे यांनी म्हटलं.

तर सनातन धर्माला दहशतवादी म्हणता, त्यावर हिंदुत्ववादी म्हणणाऱ्या पक्षाने उत्तर द्यायला हवे. हिंदूंमध्ये फूट पाडता, हिंदूविरोधी विधाने करतात. हा भगवा महाराष्ट्र आहे. हिंदुत्ववादी देश आहे अशी भावना शिंदेसेनेच्या नेत्यांनी व्यक्त करत काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांच्याविरोधात घोषणाबाजी केली.

### मुंबईत डासांचा डंख सुरुच

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : मुंबईमध्ये पावसाची उघडीप असली तरी साथीच्या आजारांनी डोके वर काढले आहे. जूनमध्ये मलेरिया व गॅस्ट्रोची रुग्णसंख्या वाढलेली होती. पण गेल्या महिन्याच्या तुलनेत जुलैमध्ये डेंग्यू, चिकुनगुनिया, मलेरिया, हिपॅटायटीसच्या रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. जुलैच्या दुसऱ्या पंधरवड्यात डेंग्यूचे ४२६, मलेरियाचे ६५१, चिकनगुनियाचे ८६ रुग्ण, गॅस्ट्रोचे ३५१ रुग्ण आढळून आले आहेत. तर हिपॅटायटीस रुग्णसंख्या पाचपटीने वाढली आहे.

जूनमध्ये पावसाळा सुरू झाल्यानंतर साथीच्या आजारांच्या रुग्णांच्या संख्येत हळूहळू वाढ होऊ लागते. मात्र यंदा मे महिन्यातच पाऊस सुरू झाल्याने साथीच्या आजारांसाठी पोषक वातावरण तयार झाले. त्यामुळे हिवताप, डेंग्यू, अतिसार आणि चिकुनगुनियाच्या आजाराच्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे. शहरामध्ये ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने लेप्टोस्पायरोसिसच्या रुग्णांमध्येही वाढ झाली होती. मात्र आता रुग्ण कमी झाले आहेत. मुंबईमध्ये जुलैच्या १५ दिवसांमध्ये ६३३ रुग्ण सापडले होते, तर या पंधरवड्यात ६५१ रुग्ण सापडले आहेत. या पंधरवड्यात डेंग्यूची रुग्णसंख्या दुप्पट झाली आहे.जुलैच्या सुरुवातीस २८२ रुग्ण आढळले होते, आता ४२६ रुग्ण आढळलेत. चिकुनगुनियाचे जुलै सुरुवातीस ४३ रुग्ण म्हणजेच दुपटीने वाढ झाली आहे. गॅस्ट्रोचे जुलैमध्ये आतापर्यंत ३५१ रुग्ण सापडले आहेत.

# तक्रारदार मित्रच निघाला खूनी; लोखंडी रॉड डोक्यात घालून केली होती हत्या

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : माझ्या मित्राला तीन ते चार जणांनी लोखंडी रॉडने मारहाण केली असून तो गांभीर जखमी झाला आहे. तर या घटनेची पोलिसांना माहिती देणारा मित्रच खूनी निघाला आहे. या घटनेमुळे हडपसर भागात एकच खळबळ उडाली आहे. रविकुमार शिवशंकर यादव वय ३३ असे खुन झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. किसन राजमंगल सहा वय २० मूळचा बिहार असे आरोपीचे नाव असून काळेपडळ पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,आरोपी मित्र किसन राजमंगल सहा याने आज पहाटे पावणे पाच वाजण्याच्या सुमारास पोलीस नियंत्रण कक्षाला फोन केला की, उंड्री हांडेवाडी येथील साईगंगा सोसायटीच्या समोरील बाजूस असलेल्या पत्राच्या शेडमध्ये माझा मित्र रविकुमार शिवशंकर यादव याला तीन ते चार जणांनी लोखंडी रॉडने मारहाण केली आहे. तो रक्ताच्या थारोळ्यात पडला असल्याची माहिती देण्यात आली. त्यानंतर आमची टीम काही मिनिटात घटनास्थळी पोहोचली आणि रविकुमार शिवशंकर यादव याला जवळील रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी तपासणी केल्यावर त्याला मृत घोषित केले.

त्यानंतर आम्हाला या घटनेबाबत माहिती देणारा किसन राजमंगल सहा याच्याकडे चौकशी करण्यास सुरुवात केल्यावर त्याने सांगितले की, दुचाकीवरून आलेल्या तीन ते चार जणांनी रविकुमार शिवशंकर यादव याच्याकडे गादी आणि बेड शीट मागितली. त्या वस्तू देण्यास नकार दिला. त्यामुळे त्यांच्यात वाद झाला आणि त्या तीन ते चार जणांनी लोखंडी रॉडने त्याला मारहाण केल्याचे सांगितले.


# पाणी मीटरला माजी नगरसेवकांचा विरोध

## थेट गुन्हे दाखल करण्याचा महापालिकेचा इशारा

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांचा रोष नको म्हणून महापालिकेकडून समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत बसविण्यात येणाऱ्या पाणी मीटरला माजी नगरसेवक व राजकीय मंडळींकडून विरोध होत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेने मीटरला विरोध करणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल करण्याचा निर्वाणीचा इशारा दिला आहे.





महापालिकेच्या पाणी वितरण व्यवस्थेमध्ये असणारी ४० टक्के गळती थांबविण्यासाठी आणि नागरिकांना एकसमान पाणीपुरवठा करण्यासाठी समान पाणीपुरवठा योजना हाती घेतली आहे. ही योजना पुढील ३० वर्षांचा विचार करून आणि शहराची संभाव्य ४९ लाख २१ हजार ६६३ लोकसंख्या विचारात घेऊन आखली आहे. योजनेंतर्गत शहरात २ लाख ६३ हजार पाणी मीटर बसविले जाणार आहेत. मीटर बसविण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना मीटरप्रमाणे पाणी पट्टी आकारली जाणार आहे. मात्र, सुरुवातीपासूनच नागरिक व राजकीय मंडळींकडून मीटर बसविण्यास विरोध होत आहे. योजनेची इतर कामे अंतिम टप्प्यात आली असताना मीटर बसविण्याचे काम मात्र कासव गतीने सुरू आहे. आतापर्यंत १ लाख ८५ हजार मीटर बसविण्यात आली आहेत. अजूनही ७८ हजार मीटर बसविणे बाकी आहे.

माजी नगरसेवक व राजकीय नेत्यांकडून आपल्या परिसरात मीटर बसविण्यास विरोध केला जात आहे. दुसरीकडे जलसंपदा विभागाकडून महापालिकेच्या पाणी वापरावर वारंवार बोट ठेवले जात आहे. विविध बैठकांमध्ये महापालिका जास्त पाणी वापरते, हेच रेटले जाते. या पार्श्वभूमीवर महापालिकेने पाण्याचे मीटर बसविण्यास विरोध केल्यास नळ जोडणीच बंद करण्याचा व संबंधितावर सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

# कोथरूड, सिंहगड रस्ता,हडपसर परिसरात अपघात ; तीघांचा मृत्यू

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : शहरात वेगवेगळ्या अपघातांत वाहनांच्या धडकेत तीन तरुणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. तर, दोघे जण गंभीर जखमी झाले. कोथरूड, सिंहगड रस्ता, हडपसर भागात अपघाताच्या घटना घडल्या. अपघातानंतर पसार झालेल्या वाहनचालकांचा शोध घेण्यात येत आहे.




कोथरूड भागात भुसारी कॉलनीकडे जाणाऱ्या सेवा रस्त्यावर शुक्रवारी दुपारी एकच्या सुमारास दोन दुचाकींची समोरासमोर धडक झाली. अपघातात दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. अपघातात दुचाकीवरील सहप्रवासी तरुण गंभीर जखमी झाला. ऋतिक एडने (वय २२, रा. पिंपळे निलख) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. सहप्रवासी आकाश अजित भेके (वय २३, रा. जुन्नर) गंभीर जखमी झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार ऋतिक आणि त्याचा मित्र आकाश बाह्यवळण मार्गावरून कोथरूडमधील भुसारी कॉलनीकडे निघाले होते. सेवा रस्त्यावर दुपारी एकच्या सुमारास समोरून भरधाव आलेल्या दुचाकीने ऋतिक आणि आकाश यांना धडक दिली. त्यात ऋतिक याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. सहप्रवासी आकाश गंभीर जखमी झाला. दोघांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच ऋतिकचा मृत्यू झाला. पोलीस उपनिरीक्षक कुंभार तपास करत आहेत.

हडपसर-मुंढवा रस्त्यावर मांजरी परिसरात भरधाव मोटारीने दुचाकीला धडक दिली. अपघातात दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला. त्याचा सहप्रवासी जखमी झाल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली. कुणाल संतोष घाडगे (वय २१, रा. गोपाळपट्टी, मांजरी बुद्रुक, हडपसर) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. अपघातात महेश बबन घाडगे गंभीर जखमी झाला. याप्रकरणी मोटारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार कुणाल आणि त्याचा चुलत भाऊ महेश शुक्रवारी रात्री एकच्या सुमारास मुंढवा रस्त्याने निघाले होते. त्या वेळी हॉटेलसमोरून भरधाव आलेल्या मोटारीने त्यांना धडक दिली. अपघातानंतर घटनास्थळी न थांबता पसार झालेल्या मोटारचालकाचा शोध घेण्यात येत असून, पोलीस उपनिरीक्षक बालाजी डिगोळे तपास करत आहेत.

# ‘लाडक्या बहिणीं’ ना मिळणार आठ ऑगस्टला रक्षाबंधनाची भेट

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील जुलै महिन्याचा निधी कधी मिळणार याची चिंता लाडक्या बहिणींना होती. त्यात ९ ऑगस्टला रक्षाबंधन असल्याने निधी वेळेत मिळाला नाही तर काय होणार याची देखील चिंता सातवत होती. मात्र, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी या विषयी ट्विट करत लाडक्या बहिणींना गूड न्यूज दिली आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येस जुलै महिन्याचा सन्मान निधी (१५०० रुपये) वितरित करण्यात येणार आहे.', असे आदिती तटकरे यांनी जाहीर केले आहे. रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येस सर्व पात्र लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात सन्मान निधीची रक्कम थेट लाभ हस्तांतरणाद्वारे जमा करण्यात येईल, असे देखील तटकरे यांनी म्हटले आहे. त्यामुळे ९ तारखेला रक्षांबधन येत असल्याने आठ ऑगस्टला महिलांच्या खात्यात १५०० रुपये जमा होणार आहेत.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या सर्व अर्जांची ओळख पटवण्यासाठी महिला व बालविकास विभागाने शासनाच्या सर्व विभागांकडून माहिती मागवली होती.

यानुसार माहिती व तंत्रज्ञान विभागाने सुमारे २६.३४ लाख लाभार्थी अपात्र असताना देखील लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत असल्याची माहिती आली आहे.

# ‘त्या’ ५९ लाख रूपयांच्या चोरीप्रकरणी अद्याप धागेदोरे नाहीत

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे: भारतीय हवाईदलातून निवृत्त झालेल्या विंग कमांडरच्या घरातून दोन चोरट्यांनी पहाटेच्या वेळी धमकावून, सोने, हिरेजडीत दागिने असे ८३ तोळे सोने, साडेसात लाख रुपयांची रोकड, दोन मोबाईल असा तब्बल ५९ लाख २४ हजार रुपयांचा ऐवज लुटला होता. दरम्यान, या घटनेला पंधरा दिवसांपेक्षा अधिक कालावधी लोटला आहे.

पोलिसांची पाच पथके या गुन्ह्याचा तपास करीत आहेत. परंतु, अद्याप पोलिसांना चोरट्यांना पकडण्यात यश आलेले नाही. विंग कमांडरच्या बंगल्यात प्रवेश करताना चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात देखील कैद झाले आहेत. परंतु, त्यांनी पळून जाताना आपण सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद होऊ नये, याची काळजी घेतल्याचे दिसते.



ही घटना मंगळवारी (दि.१५) पहाटे अडीच ते सव्वातीन वाजण्याच्या सुमारास कौशल्या बंगलो, अपंग शाळेसमोर, वानवडी गावात घडली होती. याप्रकरणी वेरीन्दरकुमार रतनलाल जंडीयाल (वय ७८) यांनी वानवडी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार पोलिसांनी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

फिर्यादी जंडीयाल हे १९९२ मध्ये भारतीय हवाईदलातून विंग कमांडर म्हणून सेवानिवृत्त झाले आहेत. तेव्हापासून ते वानवडी गाव येथे त्यांच्या कौशल्या बंगल्यात वास्तव्यास आहेत. पत्नी, मुलगा आणि सून यांच्यासोबत ते राहतात. जंडीयाल हे रिअल इस्टेटचा व्यवसाय करतात, तर त्यांच्या मुलाचा ग्रिजली मोटार वर्क नावाने व्यवसाय आहे.

बेडसमोरील अलमारी हाताने ओढून त्यातील दागिने काढून घेतले. आम्ही तुम्हाला मारणार नाही, तुम्ही जर प्रेमाने अलमारीची चावी दिली तर. चोरट्यांनी त्यांच्याकडील स्क्रू ड्रायव्हरने अलमारीचा दरवाजा उचकटून रोकड काढून घेतली. तसेच, जंडीयाल आणि त्यांच्या पत्नीचा मोबाईल हिसकावून घेत येथून हलले तर मारून टाकू, असे धमकावून पळ काढला.

जंडीयाल आणि त्यांच्या पत्नीने हॉलमध्ये येऊन पाहिले तेव्हा त्यांना हॉलचा ग्रिल दरवाजा तोडून चोरटे आत आले होते. त्यानंतर त्यांनी आपला मुलगा आणि सुनेला आवाज देऊन झालेल्या प्रकाराची माहिती दिली. पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला फोन करून जंडीयाल यांनी झालेला प्रकार सांगितला. त्यानुसार वानवडी पोलिसांनी धाव घेतली. बंगल्याचे सीसीटीव्ही फुटेज पाहिले असता, दोघे चोरटे कॅमेर्‍यात कैद झाल्याचे दिसून आले.

ही लुटीची घटना घडून पंधरा दिवसांपेक्षा अधिक कालावधी लोटला आहे. अद्याप पोलिसांना आरोपीपर्यंत पोहचता आलेले नाही. गुन्हे शाखा, स्थानिक पोलिसांची पाचपेक्षा अधिक पथके चोरट्यांच्या मागावर असल्याचे वरिष्ठ पोलिस अधिकार्‍यांनी सांगितले.

## बीबीएस, बीडीएस प्रवेशासाठी आता ४ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी सेल) एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीएचएमएस, बीयुएमएस, बीएनवायएस, बीपीटीएच, बीओटीएच या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ दिली आहे. आता विद्यार्थ्यांना यासाठी ४ ऑगस्टपर्यंत अर्ज करता येईल. त्यानंतर ११ ऑगस्टला पहिली गुणवत्ता यादी जाहीर केली जाणार आहे.

सीईटी सेलने यासाठी २३ जुलैपासून नोंदणी सुरू केली होती. विद्यार्थ्यांना आता ४ ऑगस्टपर्यंत अर्ज आणि ५ ऑगस्टपर्यंत नोंदणी शुल्क भरणा करता येणार आहे.




# मुंबई, मालेगाव स्फोट केले कुणी?

**मुंबई साखळी बॉम्बस्फोटातील सर्व आरोपी नुकतेच तपास यंत्रणातील त्रुटींमुळे निर्दोष सुटले. त्यानंतर पुन्हा मालेगाव बॉम्बस्फोटाच्या महत्त्वाच्या खटल्यात विशेष न्यायालयाने सर्व सात आरोपींना निर्दोष ठरवले. इतकेच नव्हे तर एटीएस आणि एनआयए सारख्या भक्कम यंत्रणांनी तपास करूनही एकाही आरोपीच्या विरोधात त्यांना ठोस पुरावा देता आला नाही. त्यामुळे पुन्हा एकदा तसाच निर्णय झाल्याने तपास यंत्रणांवरच संशय निर्माण झाला आहे. या थक्क करणाऱ्या दोन्ही निकालांमुळे स्फोट नक्की कोणी केला, असा प्रश्न निर्माण झाला आहे. मुंबईबाबत सर्वोच्च न्यायालयात अपिल झाले, पण मालेगावच्या या निकालाच्या विरोधात सरकार अपील करणार का हा प्रश्नही विचारला जात आहे. एवढेच नव्हे तर महायुतीचे सरकार हिंदू दहशतवाद हा काँग्रेसचेच षड्यंत्र असल्याचा आरोप करीत आहे. त्यामुळे एकूणच तपास यंत्रणेला दोषी ठरविणार की त्यांच्यावर याप्रकरणी कारवाई करणार हाही प्रश्न आहे.**



**मा**लेगाव न्यायालयाने आरोपींना निर्दोष ठरवले, पण ६ मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये मदत देण्याचा सरकारला आदेश दिला. हा निकाल देताना एनआयए न्यायालयाचे न्यायाधीश ए. के. लाहोटी यांनी आरोपी साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, ले. कर्नल प्रसाद पुरोहित, मेजर रमेश उपाध्याय (निवृत्त), अजय राहिरकर, सुधाकर द्विवेदी, सुधाकर चतुर्वेदी आणि समीर कुलकर्णी यांची पुराव्याअभावी सुटका केली. यावेळी न्यायालयाने नमूद केले की, सरकारी पक्ष कोणताही ठोस आणि विश्वासार्ह पुरावा सादर करण्यात अपयशी ठरले. केवळ नैतिक आधारावर शिक्षा करता येत नाही. त्यामुळे सर्व आरोपींना संशयाचा फायदा दिला जात आहे. या निर्णयावर पीडितांचे वकील शाहीद नदीम यांनी नाराजी व्यक्त केली. मुंबई रेल्वे बॉम्बस्फोटातील आरोपींच्या निर्दोष सुटकेवर स्थगिती मागणारे मोदी आणि फडणवीस या निकालाविरोधात अपील करतील का? एनआयए किंवा एटीएसच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या दोषपूर्ण तपासासाठी जबाबदार धरले जाईल का? २०१६ मध्ये सरकारी वकील रोहिणी सालियन यांनी सांगितले होते की, एनआयएने आरोपींबद्दल सौम्य भूमिका घेण्यास सांगितले होते.

या निकालाबाबत खुद्द मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'आतंकवाद भगवा न कभी था, ना था, ना कभी रहेगा' अशी एक्स पोस्ट केली. राष्ट्रवादी व तत्कालीन काँग्रेस सरकारने भगवा दहशतवाद आणि हिंदू दहशतवाद असे चुकीचे चित्र निर्माण करण्याचा कट रचला होता. आज तो कट उघडा झाला. फक्त विशिष्ट धर्माच्या मतपेटीसाठी काँग्रेसने हा प्रपंच केला आणि सर्व हिंदूंना दहशतवादी ठरवण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी काँग्रेसने देशाची माफी मागावी, अशी मागणी केली आहे. त्यावर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, पहिली गोष्ट म्हणजे बॉम्बस्फोट



राजरंग

– अमृत चौगुले

झाला, त्यात लोकांचा मृत्यू झाला. जर बॉम्बस्फोट झाला तर त्यातील आरोपी गेले कुठे हा स्वाभाविक प्रश्न अनुत्तरित आहे. जे दोषी असतील त्यांना पकडले पाहिजे, त्यांना शिक्षा होणे या दृष्टीने सरकार पुढे काय करणार हा प्रश्न आहे.

शहीद हेमंत करकरे यांनी या प्रकरणाचे धागेदोरे शोधले होते, त्याचे पुढे काय झाले? स्फोटातील आरोपींना शोधले पाहिजे, ही सरकारची जबाबदारी आहे. शहीद पोलिस अधिकारी हेमंत करकरे यांच्या मार्गदर्शनात एटीएसने मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात दाखल केलेल्या आरोपपत्रात नमूद केलेले पुरावे शास्त्रीय आणि भक्कम होते असा दावा माजी पोलिस अधिकारी आणि 'हु किल्ड करकरे' पुस्तकाचे लेखक शमशुद्दीन मुश्रीफ यांनी केला होता. ते म्हणाले, करकरे यांच्या पुराव्यावरून कथित आरोपींचा कट आमच्यादृष्टीने सिद्ध होतो. मात्र, न्यायालयाने याकडे कोणत्या दृष्टीने पाहिले याची कल्पना नाही. न्यायालयाने निकालपत्रात म्हटले आहे की, बॉम्ब ज्या मोटारसायकलला लावला होता ती मोटारसायकल प्रज्ञासिंह ठाकूर यांची असल्याचे पुरावे नाहीत. फॉरेन्सिक अहवालात मोटारसायकल चेसिसचा संपूर्ण क्रमांक सापडलेला नाही. साध्वी प्रज्ञा यांनी दोन वर्षांपूर्वीच संन्यास घेतला होता आणि भौतिक वस्तूंपासून निवृत्त झाल्या होत्या. कर्नल पुरोहित यांनी काश्मीरमधून आरडीएक्स आणले किंवा बॉम्ब तयार केला याबाबत कोणताही ठोस पुरावा नाही. आरोपींच्या मोबाईलमध्ये कोणतेही पुरावे आढळले नाहीत.

आरोपींवर यूएपीए लावणे योग्य नव्हते. तपास यंत्रणांनी पंचनामा नीट केला नाही. हाताचे ठसे सापडले नाहीत. जखमींची संख्या ९५ होती. त्यामुळे बनावट जखमी प्रमाणपत्र आणि फेरफार झाल्याचा संशय आहे. फक्त संशयाच्या आधारावर आरोपींना शिक्षा देऊ शकत नाही. डिसेंबर २०१८ मध्ये खटल्याला सुरुवात झाली. सरकार पक्षाने ३२३ साक्षीदार तपासले, यातील ३४ जणांनी साक्ष बदलली तर ३० हून अधिक साक्षीदारांचा मृत्यू खटल्या दरम्यान झाला. संशयित सुधाकर द्विवेदी यांनी स्फोटच झाला नसल्याचा दावा केला होता. त्यामुळे १०० हून अधिक पीडित आणि जखमी साक्षीदारांची सखोल चौकशी झाली. एप्रिल २०२४ मध्ये अंतिम युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने निर्णय राखून ठेवला होता. एकूणच काय मुंबई असो वा मालेगाव बॉम्बस्फोट, न्यायालयाच्या निकालानंतर आरोपी निर्दोष ठरले असतील तर स्फोट आपोआप झाला का?, कट कुणी केला?, आरडीएक्स कुणी आणले?, एनआयए अमित शहा यांच्या नेतृत्वात काम करत आहे काय? त्यामुळे आता पुढे याची नव्याने तपासणी आणि आरोपींचा शोध सुरू होणार का, हे प्रश्न अनुत्तरित आहेत. ■■■

# बिहारमधे जंगलराज, सत्ताबदलाचे शस्त्र


**बिहारमधे कायदा व सुव्यवस्था ढासळलेली आहे, असा आरोप नेहमीच राजकीय पक्षांकडून होत असतो. राजदचे सुप्रीमो लालूप्रसाद यादव व त्यांच्या पत्नी राबडी देवी यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात खून, अपहरण, चोऱ्या– दरोडे, महिलांवर अत्याचार, लूटमार अशा घटनांनी बिहार पोखरून निघाला होता. रस्त्यावरून एकट्या महिलेला त्या काळात सुरक्षितपणे जाणे कठीण होते. सायंकाळनंतर लोकांना घराबाहेर पडणे मुष्कील होते.**



**ला**लू– राबडी देवी यांनी व त्यांच्या पक्षाने बिहारमधे प्रदीर्घ काळ सत्ता उपभोगली. त्यांच्या कारकिर्दीला भाजपाने जंगलराज असे संबोधायला सुरूवात केली. लालू यादव मुख्यमंत्री असतानाचा काळ हा जंगलराज होता, से सांगूनच नितीश कुमार यांनी लालूप्रसाद यादवांकडून भाजपाच्या मदतीने सत्ता हिसकावून घेतली.

भाजपाच्या आशीर्वादाने त्यांनी मुख्यमंत्रीपदही मिळवले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बिहारमधे ठिकठिकाणी जाहीर सभा होत आहेत, त्यातही ते लालू यादव यांची आठवण करून देत, जनतेला ते प्रश्न विचारतात– येत्या विधानसभा निवडणुकीनंतर बिहारमधे पुन्हा जंगलराज आणायचे आहे काय ? बिहारला जंगलराज म्हणणे हे जणू गेली दोन दशके राजकीय शस्त्र बनले आहे.

नितीश कुमार गेली पंधरा वर्षे मुख्यमंत्री आहेत. गेल्या काही काळात राज्यात कायदा सुव्यवस्था कमालीची ढासळली आहे. जंगलराज हे शस्त्र वापरून भाजपाने बिहारमधे सत्ताबदल घडवला. आता तोच शब्द नितीश कुमार यांच्यावर बुमरँग तर होणार नाही ना ? अशी भिती जनता दल यु व भाजपाला वाटू लागली आहे. नितीश कुमार यांचे येत्या निवडणुकीतील प्रमुख राजकीय विरोधक, लालूप्रसाद यांचे पुत्र व राजदचे नेते तेजस्वी यादव यांनी नितीश कुमार यांच्या काळात बिहारमधे जंगलराज निर्माण झाल्याचा आरोप केला आहे व प्रत्येक सभेत जंगलराज म्हणून ते नितीश कुमार यांच्या सरकारला हिणवत आहेत. लालूप्रसाद व राबडी देवी यांच्या सरकारच्या काळाला जंगलराज असे संबोधून, आपण स्वत: स्वच्छ राजकारणी असल्याची प्रतिमा नितीशबाबूंनी निर्माण केली होती. एवढेच नव्हे तर नितीश कुमार यांचा उल्लेख मिडियामधून सुशासनबाबू असा केला जात होता. पण गेल्या काही वर्षात बिहारमधे हत्या, अपहरण, दरोडे, अत्याचार, लूटमारीच्या घटना दिवसाढवळ्या होत आहेत, म्हणून जंगलराज नावाचे शस्त्र सुशासनबाबूंचा येत्या निवडणूक वेध घेणार का, अशी चर्चा सुरू झाली आहे. बिहारची राजधानी पाटणा शहर हेच आज सुरक्षित राहिलेले नाही. भर दिवसा गोपाल खेमकांवर झालेल्या गोळीबाराने सारे शहर हादरले. पोलीस ठाण्यापासून जवळच अंतरावर एका व्यापाऱ्याची हत्या झाली. तरी पोलीस काही करू शकले नाहीत. पाटण्याच्या इस्पितळात पाच बदमाश हातात बंदुका घेऊन घुसतात व तेथे उपचार चालू असलेल्या कुविख्यात गुन्हेगाराला गोळ्या घालून सर्वासमोर पसार होतात तरीही सुरक्षा व्यवस्था ढिम्म हालली नाही. नंतर काहींना पोलिसांनी अटक केली व त्याचा गाजावाजाही केला. पण जेव्हा दिवसा ढवळ्या हत्या होत आहेत तेव्हा पोलीस व सुरक्षा यंत्रणा कुठे असते ? राज्याचे सुशासन काय करते ? सन २०१५ ते २०२४ या काळात बिहारमधील गुन्हेगारीत ८० टक्के वाढ झाली आहे. न'शनल क्राइम रिसर्च ब्युरो व स्टेट क्राइम रेकॉर्ड ब्युरो यांच्या अहवालातूनच ही आकडेवारी बाहेर आली आहे. सन २०१५ नंतर नितीश कुमाराच्या सुशासन काळात राज्यातील गुन्हेगारी सतत वाढत आहे. गेल्या तीन वर्षात दरवर्षी साडेतीन लाखापेक्षा जास्त गुन्ह्याची नोंद पोलिसांकडे आहे. देशात सर्वाधिक गुन्हे घडत असलेल्या १० राज्यात बिहार चे नाव कायम आहे. दिल्ली व केरळमधे गुन्ह्यांची संख्या जास्त असली तरी ती राज्ये शिक्षण व आर्थिक क्षेत्रात बरीच आघाडीवर आहे. बिहारची लोकसंख्या तुलनेने जास्त पण शिक्षण व आर्थिक क्षेत्रात मागास राज्य अशी ओळख आहे. बिहारने गुन्हेगारीतही अव्वल स्थान कायम ठेवले आहे. नितीश कुमार यांच्या सरकारला हे मुळीच भूषणावह नाही. मुख्यमंत्री नितीश कुमार हे आपले सरकार किती शिस्तप्रिय, पारदर्शक व सुशासन आहे हे सांगताना प्रत्येक कार्यक्रमात लालूप्रसाद –राबडीदेवी सरकार असताना बिहार म्हणजे कसे जंगलराज होते याची आवर्जून आठवण करून देत. पण गेल्या वर्षभरात त्यांनी जंगलराजची आठवण करून देणे थांबवले आहे. आज बिहारची अवस्था जंगलराज सारखीच आहे, याची त्यांनाही जाणीव झाली असावी. दि. १८ जुलै रोजी मोतीहारी येथे जनता दल यु व भाजपाची विराट सभा झाली. निवडणुकीचे रणशिंग फुंकण्यासाठीच ती सभा होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री नितीश कुमार हे दोघेही व्यासपीठावर हजर होते. लालूप्रसाद यादव यांच्यावर प्रत्येक कार्यक्रमात जंगलराज म्हणून संबोधणारे दोन्ही नेते यावेळी या मुद्यावर शांत राहिले. नरेंद्र मोदी किंवा नितीश कुमार दोघांनीही त्या सभेत जंगलराज हा शब्दही उच्चारला नाही. बिहारमधे मोठ–मोठ्या विकास योजना कशा येत आहेत व केंद्र सरकार बिहारच्या विकासासाठी हजारो कोटी रूपये कसे देत आहे हे पंतप्रधानांनी सविस्तर आपल्या भाषणातून सांगितले. पण बिहारमधील रस्त्यांवर दहशत आहे, याचा कुठे एका शब्दानेही उल्लेख केला नाही.



वास्तव

– डॉ. सुकृत खांडेकर

कायदा व सुव्यवस्था चांगली राखण्यासाठी नितीश कुमार याचे सरकार काही ठोस पावले उचलते असेही काही दिसत नाही. सिवानमधे एका रात्रीत तीन हत्या झाल्या, नालंदामधे दुहेरी हत्याकांड घडले, पाटण्यात तर गँगवॉर चालू आहे. बिहारमधे तरूण बेरोजगारांची संख्या कित्येक लाखात आहे.


रोजगारासाठी दरवर्षी लक्षावधी तरूणांचे लोंढे मुंबई, पुणे, दिल्ली, बंगळुरू, हैदराबादवर आदळत असले तरी राज्यात बेरोजगारी ही भीषण समस्या आहे. लाल प्रसाद यादवांपासून नितीश कुमारांपर्यंत गेल्या चार दशकात रोजगार निर्माण करण्यात सरकारला अपयश आले. त्याचा परिणाम म्हणून गुन्हेगारी वाढत आहे. निवडणूक प्रचारात जंगलराज शब्दाचा वापर केला तर गेली पंधरा वर्षे तुम्हीच सत्तेवर आहात मग राज्यात कायदा सुव्यवस्था का ढासळली आहे आहे असे मतदार प्रश्न विचारतील याची जाणीवही भाजपाला झाली आहे. म्हणूनच केंद्र सरकारने दिलेल्या निधितून बिहारचा विकास कसा होतो आहे, या मुद्यावर भाजपा प्रचारात भर देईल असे वाटते. उत्तर प्रदेशात माफियांवर बुलढोझर चालवले जातात मग बिहारमधे का नाही असा प्रश्न लोक विचारत आहेत. बिहारचे पोलीस व गुन्हेगार यांची हातमिळवणी आहे, असा आरोप एनडीएचे घटक पक्ष असलेल्या एलजेपी चे नेते चिराग पासवान यांनी जाहीरपणे केला आहे. राज्याचे नेतृत्व सजग नसून ग्लानीत आहे म्हणून वास्तव चित्र काय आहे हे सरकारला समजतच नाही, अशी टीका राजदचे तेजस्वी यादव यांनी केली आहे. बिहारची जनता जातीच्या मुद्यावर, विकासाच्या अजेंड्यावर की जंगलराजवर मतदान करणार हा कळीचा मुद्दा आहे. ■■■

# मैत्री पैशाशी

**मैत्री करायला प्रत्येकाला आवडते हे जर खरे असेल तर पैशाशी मैत्री करायला मिळाली तर? पैसा बोलतो त्याची एक बलाढ्य शक्ती असते. तो मदतीला धावून येतो, प्रतिष्ठा मिळवून देतो. त्याच्या बळावर काहीही करता येते' पैशाची हाक आणि धाक हा वेगळाच असतो. माणसाला पैशाची हाक जशी ऐकू येते तशी आतल्या आत्म्याची हाक ऐकता आली तर? स्वार्थ आणि परमार्थाची सांगड घालून पैशाशी मैत्री करायला जमली तर ?**

'**मै**त्री'ला आयुष्यात खूप महत्त्वाचे स्थान असून ते खूप नाजूक, चिरेबंदी, चिरस्थायी आणि ऐच्छिक असे नाते आहे. मैत्री कुणाशीही होऊ शकते. निसर्गाशी असो वा व्यक्तीशी मैत्री हि मैत्रीच असते. तू माझा मित्र होशील का? तू माझी मैत्रीण होशील का ? असे विचारून मैत्री करता येते का? करता आली असती तर ? मैत्री हि जशी करण्याची गोष्ट आहे तशी ती निभावण्याची गोष्ट आहे याचा बऱ्याचदा विसर पडतो. मैत्रीचे वैशिष्ट्य म्हणजे ती हवीहवीशी वाटली पाहिजे. पुन्हा प्रश्न उपस्थित होतो तो म्हणजे माणसाला काय काय हवेहवेशे वाटते. याचे उत्तर माणसाला सर्वच हवे असते. त्यामुळे तर मुखातून शब्द बाहेर पडतात. हवास मज तू हवास तू मैत्रीच्या बाबतीत असे होत नाही चांगला मित्र मिळणे हे अवघड आहे. म्हणून मैत्री करीत असताना फार विचार करून करावी असेच म्हटले जाते. मैत्रीमध्ये सच्चेपणा महत्वाचा मानला जातो.

मैत्रीच्या बाबतीत असेच आहे एकमेकांना नेहमीच असे वाटत असते कि, हवास मज तू हवास तू खरेतर हेच



समीकरण पैशाच्या बाबतीत आहे. तो माणसाला हवाहवासा वाटतो. पैशाशी मैत्री हा शब्द प्रयोग आपणास नवीन वाटण्याची शक्यता आहे. मात्र वस्तूस्थिती पहिली तर एक गोष्ट लक्षात येते कि, माणसाने जे अनेक शोध लावले आहेत त्यामध्ये अग्नी, चाक आणि पैशाचा शोध महत्वाचा मानला जातो. त्याच्यापुढे जाऊन सांगावयाचे झाल्यास माणसाने पैशाशी जी मैत्री केली ती गरजेतूनच. माणसाला पैसा हवाहवासा वाटतो. त्याचे खरे कारण म्हणजे माणसाचे पैशाविना काहीच चालत नाही. पैसा बोलता है अशी अवस्था आहे. जो माणूस मी पैशाशी मैत्री करणार नाही असे म्हणेल तो एक तर वेडा असावा किंवा व्यवहार शून्य असण्याची शक्यता आहे. पैशाच्या बाबतीत माणसापुढे दोन पर्याय आहेत. एक म्हणजे पैशाची दोस्ती करणे किंवा पैसेवान माणसाशी मैत्री करणे. काळाच्या ओघात माणूस योग्य तो पर्याय निवडतो. वैभव, संपन्नता, प्रतिष्ठा मिळवून देणारा पैसारूपी मित्र नेहमी सोबत किंवा जवळ घेऊन मिरवायला माणसाला खूपच आवडते. माणसाला पैसा हवाहवासा वाटतो त्याचे कारण पैसा आणि माणसातील नाते फार नाजूक आहे. असे असूनही तो अनेक कारणाने तो माणसापासून दूर पळत असतो. माणसाला वेग आहे तर पैशाला भ्रमण वेग आहे. त्यामुळेच माणसाला पैशाचा विरह सहन होत नाही. त्यातूनच सुरु होतो तो पाठशिवणीचा खेळ. पैसारूपी मित्र फार विचित्र आहे. तो कधी हुलकावणी देईल सांगता येत नाही म्हणून तर म्हटले जाते कि पैसा नावाचा मित्र फार चंचल आहे. तो आज आहे तर उद्या नाही. एव्हाना पैसा असा एक मित्र आहे कि, तो असला तरी समस्या आणि नसला तरी समस्या. एव्हाना पैसा असा मित्र आहे तो खूपदा छळतो, आपल्यापासून दूर पळतो. आणि तो नसल्यावर आपल्याला



अर्थतरंग

प्रा. संजय ठिगळे

कळतो. तो अनेकांना जोडतो तर अनेकांना तोडतो. तो आपल्या नात्यातल्या सीमारेषा अधिक गडद करतो.

पैशाने काहीही करता येते हे एकदा लक्षात आले कि पैशासाठी काहीपण हे एक नवीन सूत्र तयार होते. त्यामुळे माणूस पैशासाठी हैवान होतो. पैसा जोडतो आणि तोडतो सुध्दा त्यामुळे फार जपून राहावे लागते. पैशाशिवाय विकास नाही हे आता लपून राहिले नाही. आपण कितीही म्हटले कि, सर्व ग्रामासि सुखी करावे । अन्न-वस्त्र-पात्रादी द्यावे किंवा मित्र वाढो त्रिभुवनी । मात्र हे सर्व अहो करण्यासाठी सरकारजवळ आणि लोकांच्याजवळ पैसा लागतो. चांगल्या माणसाचा आणि सरकारचा खिसा फाटका असून चालत नाही. 'संकटे येऊ शकतात ती जीवघेणी असू शकतात. त्यामुळे पैसा हवाच. पैशाशी मैत्री का करावयाची त्याचे सरळ उत्तर म्हणजे त्याच्याशिवाय तुमचे काहीच चालत नाही गरज आणि उपयुक्तता या दोन घटकाशी त्याचे नाते जोडलेले आहे. खरे तर जो गरजेला धावून येतो तो आपला खरा मित्र. पैसा नावाचा मित्र फार चपळ आणि अवखळ आहे. पैशाशी मैत्री ही मानवी जीवनाचा जणू काही गाभाच आहे. त्यामुळेच पैशासारखा मित्र नसणे हे आपणास जीवघेणे वाटण्याची शकता आहे. आधुनिक जगात पैशासारखा मित्र नसणे ही लज्जास्पद गोष्ट समजली जाते'. खरेतर पैसा माणसाचा कितीही जवळचा मित्र झाला असला तरी त्याच्याविषयी असणारी अनामिक भीती बरेच काही सांगून जाते. पैशापासून चार हात दूर राहण्याचा प्रयत्न केला तरी पैसा आपला पाठलाग सोडत नाही. माणसाला पैसा माझ्यापाठीमागे धावतो कि मी पैशाच्या पाठीमागे धावतो आहे. हे ओळखता आले पाहिजे. नाहीतर एकतर्फी प्रेमासारखे होऊन बसते. आपणच त्याच्या पाठीमागे धावतो अशीच कमी जास्त प्रमाणात अवस्था असते.

पैसारूपी मित्र मिळवण्याच्या अनेक क्लुप्त्या आणि सूत्रे माणूस शोधत असतो मात्र त्या सर्वांनाच जमतात असे नाही. मात्र एकदा का या क्लुप्त्या आणि सूत्रे अवगत झाली कि तो भविष्यकाळाचा फारसा विचार करित नाही. पैशाशी नाते जोडण्याचा आणि ते अधिक घट्ट करण्याचा माणसाला जणू आवड आणि छंदच लागतो. हळूहळू आवडीचे आणि छंदाचे रूपांतर व्यसनात होते. पैसारूपी मित्र आपल्यापासून दूर जाईल कि काय अशी वाटणारी भीती वाईट असते. एक वेळ अशी येते कि कुणीही सोबत नसले तरी चालेल मात्र पैसा नावाचा मित्र सोबत असला पाहिजे असे वाटू लागते. त्याचे खरे कारण म्हणजे त्याला माहित असते. मी नाही बोललो तर माझा पैसाच बोलेल. अर्थात हि गोष्ट खरी आहे सध्या पैसा बोलता है असे वाटण्यासारखी अवस्था आहे. मात्र पैसा हे साधन आहे साध्य नाही हे विसरून चालणार नाही.

पैसारुपी मित्र एक वेगळे त्रांगडे आहे. पैसा नावाच्या मित्राला तुम्ही कामाला लावले नाही तर तो तुम्हाला कामाला लावतो. काही काळ तो आपल्यासोबत चालतो हळूहळू आपल्या समवेत चालणारा पैसा हळूहळू धावू लागतो आणि त्या धावणाऱ्या पैशाच्या पाठीमागे धावून आपली दमछाक होते हे आपल्या फार उशिरा लक्षात येते. ज्यावेळी हे लक्षात येते तेंव्हा बऱ्यापैकी उशीर झालेला असतो किंवा वेळ निघून घेलेली असते. खेड्यातल्या जीवनाला खरी अवकळा येण्याचे कारण शेतकऱ्याला निसर्ग नावाचा चांगला मित्र मिळाला मात्र पैसा निसर्गाएवढा जवळचा मित्र झाला नाही. पैशाने सर्व विश्व व्यापल्यामुळे पैसा मित्र होण्याच्या ऐवजी अनेकांचा देव झाला तर अनेकांच्या गळ्यातील ताईत होऊन बसला. पैशाशी ज्यांची मैत्री जमली त्यांचा जयजयकार होऊ लागला आहे. हे जरी खरे असले तरी माणसातली माणुसकी हरपून जाईल एवढी पैशासी मैत्री चांगली नव्हे बरे का? पैसा हे साधन आहे साध्य नाही. ■■■

## साप्ताहिक राशी भविष्य

## दि. ३ ऑगस्ट २०२५ ते ९ ऑगस्ट २०२५



**मेष :** कुणीतरी तुम्हाला आव्हान देण्याचा प्रयत्न करेल. पण त्याकडे दुर्लक्ष करा. मन सैरभैर होईल. आपली आजवर रेंगाळलेली कामे प्रतिष्ठित व्यक्तीच्या सहकार्याने पूर्ण करण्यात यशस्वी व्हाल. आरोग्याच्या जुन्या तक्रारी डोके वर काढतील. नेत्रविकार, उष्णतेचे विकार यांच्यापासून त्रास होण्याची शक्यता आहे. नवनवीन कल्पना आकार घेतील. व्यवसाय उद्योगात नवनवीन प्रकल्प हाती घेऊन यशस्वीपणे पूर्ण कराल.



**वृषभ :** पत्नीचा सल्ला महत्त्वाचा ठरेल. एकमताने निर्णय घ्याल. सामाजिक प्रतिष्ठा उंचावेल. विवाहेच्छुक तरुणांचे विवाह ठरतील. प्रतिस्पर्धेची चाल पाहूनच पुढे वाटचाल करावी. नवीन नोकरीच्या शोधात असणाऱ्या अनिश्चितता जाणवेल. आपली मते डळमळीत ठेवू नका. वाहन चालविताना वाहनाच्या वेगावर नियंत्रण ठेवावे. कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नका. प्रत्येक काम जबाबदारीने पार पाडा. प्रवास घडून येतील.



**मिथुन :** न्याय प्रविष्ठ प्रकरणातून लाभ होतील. थोरा-मोठयांच्या सहकार्याने आपली रेंगाळलेली कामे मार्गी लागतील. कर्जप्रकरणे मंजूर होतील. आपल्या कार्यकौशल्यामुळे कार्यक्षेत्रातून आपली प्रशंसा केली जाईल. आपल्या इच्छा, आकांक्षा कृतीत आल्यामुळे समाधान लाभेल. पत्नीचा सल्ला महत्त्वाचा ठरेल. भागीदारीत व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांनी मात्र सतर्कतेने निर्णय घेणे गरजेचे आहे.



**कर्क :** उच्च शिक्षणासाठी प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य ठिकाणी प्रवेश मिळेल. संततीच्या उत्कर्षाची वार्ता कानी येईल. ज्या लोकांमुळे तुम्ही अडचणीत येता, अशा लोकांपासून आज लांब रहा. कुणीतरी तुम्हाला आव्हान देण्याचा प्रयत्न करेल. तब्येतीची काळजी घ्या. मानसिक थकवा जाणवेल. कामात अडथळे येण्याची शक्यता आहे.



**सिंह :** व्यावसायिक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून आधुनिक उपक्रम राबविता येतील. आशावादी धोरण स्वीकाराल. नवनवीन प्रकल्प हाती घेऊन यशस्वीपणे पूर्ण कराल. रेंगाळलेली कामे विना सायास मार्गी लागीतल. सामाजिक क्षेत्रातील आपल्या आघाडीच्या नेतृत्वामुळे समाजात प्रतिष्ठा उंचावेल. इच्छापूर्ती होईल. नवी दिशा सापडेल. जुन्या मैत्रीला उजाळा मिळेल. तुमच्या कार्यक्षेत्रात प्रसिध्दी लाभेल. पुढे घडणाऱ्या घटनांची आपल्याला चाहूल लागेल.



**कन्या :** नवीन व्यावसायिक करार घडतील. प्रगतीपथावर मार्गक्रमण करण्यासाठी सतत नवीन योजनांची आखणी कराल. आपले आवडते छंद जोपासण्यासाठी वेळ देता येईल. नवीन व्यवसायासाठी भांडवल उभे कराल. गृहसुशोभिकरणासाठी आकर्षक, शोभेच्या वस्तूंची खरेदी केली जाईल. कौटुंबिक जबाबदाऱ्या स्वीकाराल. घरातील वातावरण आनंदी, उत्साही, राहील. कामानिमित्त प्रवास घडतील. जुने मित्र भेटतील त्यांच्या बरोबर आनंद लुटण्याचे क्षण येतील.



**तूळ :** भावंडांचा एखादा सल्ला लाखमोलाचा ठरेल. कुटुंबातील वातावरण आनंदी, उत्साही राहील. महत्त्वाचे निर्णय घेताना आपली मते ठाम ठेवलीत व प्रत्येक पाऊल सावधतेने उचलले. तर त्याचा आपल्याला त्रास होणार नाही आणि आशेचा नवीन किरण दिसेल. परक्या माणसाकडून अचानक मदत मिळाल्यामुळे लाभ होतील. पूर्वार्जित मालमत्तेचे व्यवहार घडून येतील. घरातील सुखसुविधा वाढविण्याकरीता इलेक्टॉनिक्सच्या वस्तूंची खरेदी केली जाईल. स्वत:च्या कल्पना शक्तीच्या जोरावर मोठी प्रगती साधाल.



**वृश्चिक :** सकारात्मक विचारांचा फायदा होईल. आपण हाती घेतलेले प्रत्येक काम यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी सहाय्यकांची मदत मोलाची ठरणार आहे. व्यवसायात जवळच्या नातेवाईकांना सहभागी करून घेणे शक्य असेल तर जरूर करा. नव्या कामाचा प्रस्ताव येईल. कामाच्या पध्दतीत केलेला थोडासा बदल करावा सुखावह वाटेल. घरातील सुख सुविधा वाढविण्याकरता नवीन खरेदीचे मनसुबे महिला आखतील.



**धनु :** आपल्या कार्यक्षेत्रातील महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी मनाचा उत्साह कमी पडण्याची शक्यता आहे. व्यवसायातील अडचणींना तोंड द्यावे लागेल. त्यामुळे नवीन उपक्रम राबविणे पुढे ढकलावे. तज्ज्ञ व्यक्तींचा सल्ला लाख मोलाचा ठरेल. नवीन जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील. कार्यक्षेत्रातील प्रशिक्षणाच्या निमित्ताने परदेशी संस्थांशी संबंध येतील. समाजात आपली प्रतिष्ठा वाढविण्यासाठी सतत कार्यरत रहाल.



**मकर :** राहत्या जागेचे किंवा व्यवसायाच्या जागेचे प्रश्न सुटतील. महिला स्वत:च्या पध्दतीने गृह सजावट करतील. महिलांना बदलाची नितांत गरज भासेल. उपासना मार्गातील लोकांना चांगली अनुभूती मिळेल. आपल्याला चांगला मार्गदर्शक भेटेल. नवनवीन कल्पना आकार घेतील. व्यवसाय उद्योगात नवनवीन प्रकल्प हाती घेऊन यशस्वीपणे पूर्ण कराल. शैक्षणिक क्षेत्रात परदेशातील संस्थांशी संबंध येतील. आपली आर्थिक बाजू बळकट करणाऱ्या घटना घडतील.



**कुंभ :** व्यावसायिक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून आधुनिक उपक्रम राबविता येतील. आशावादी धोरण स्वीकाराल. व्यवसायीक उद्योगातील कामानिमित्त कर्ज प्रकरण रखडले असेल तर ते मार्गी लागेल. प्रिय व्यक्तींच्या भेटी होतील. राजकीय, सामाजिक क्षेत्रात प्रतिष्ठा लाभेल. वरीष्ठांच्या सल्ल्यानेच कामे मार्गी लावा. नोकरीत मनासारख्या घटना घडतील. उत्साह वाढेल.



**मीन :** दूरवरचे प्रवास घडून येतील. प्रवासातून कार्यसिध्दी होईल. आत्मोन्नतीचा मार्ग सापडेल. कामाचे चांगले नियोजन कराल. धावपळीचे, कष्टाचे सार्थक होईल. नव्या कामात अपेक्षित यश मिळेल. आव्हानात्मक कामातून यशस्वी व्हाल. धाडसी निर्णय घेतले जातील. योग्य व्यक्तीचे मार्गदर्शन लाभेल. नोकरीत मनाजोगी बढती, बदली झाल्याने उत्साह वाढेल. नव्या उमेदीने कामाला सुरुवात कराल. व्यवसाय उद्योगात आपणास विरोध करणाऱ्या व्यक्तींकडून लाभ होतील.

# अधिक मानवीय होण्यासाठी वाचन उपयुक्त : लक्ष्मीकांत देशमुख

## अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या पुरस्कारांचे वितरण

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : वाचनातून घडणारे संस्कार महत्त्वाचे असतात. चारित्र्यवान पिढी घडण्यासाठी बालवयापासून मुलांना वाचनाची गोडी लावणे आवश्यक आहे. वाचन हे मानवनिर्मित कृत्रिम माध्यम असले तरी ती उन्नत मानवी संस्कृती आहे. वाचनातून जिज्ञासा वाढीस लागते आणि त्यातूनच आकलन वाढते. वाचन आपल्या प्रत्येकाच्या प्रगतीचा एक भाग आहे. अधिक मानवीय होण्यासाठी वाचनच उपयुक्त आहे, असे प्रतिपादन ९१व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणेतर्फे सन २०२४ वर्षातील राज्यस्तरीय विविध साहित्य पुरस्कारांचे वितरण आज (दि. २) लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते झाले. त्यावेळी देशमुख ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संदर्भ तज्ज्ञ व ग्रंथ प्रसारक प्रसाद भडसावळे होते. संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू, कार्याध्यक्ष अनिल कुलकर्णी, मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. राजेंद्र झुंजारराव, मॉडर्न महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. निशा भंडारे, संजय ऐलवाड व्यासापीठावर होते.

मॉडर्न महाविद्यालयातील मराठी विभागाच्या सहकार्याने आयोजित कार्यक्रम महाविद्यालयातील लता मंगेशकर सभागृहात झाला. सन्मानपत्र, रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप होते. अभिनव वाचन उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार प्रशस्तिपत्र, ग्रंथभेट देऊन करण्यात आला. वाचनासाठी विद्यार्थ्यांना उद्युक्त करणाऱ्या शिक्षकांचाही सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. विश्वस्त राजेंद्र कुलकर्णी व कार्यकारिणी सदस्य शिवाजी चाळक, सचिन बेंडभर हे उपस्थित होते.



अवांतर वाचन हे निरंतर, आनंददायी शिक्षणच आहे, असे सांगून देशमुख पुढे म्हणाले, राज्यकर्ते लोकशाही टिकवित नाहीत तर सजग नागरिक ती टिकवितात. सजग नागरिक बनण्यात वाचनाचे मोठे योगदान आहे. लेखक, प्रकाशक, चित्रकार, वाचक आणि ग्रंथालये हे वाचन संस्कृतीचे महत्त्वाचे घटक आहेत. आजच्या बालपिढीचे भावविश्र्व बदलते आणि आव्हानात्मक आहे, त्या भावविश्र्वात बाल साहित्य लेखकाने डोकावले पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

प्रसाद भडसावळे म्हणाले, संस्कार ही लादण्याची नव्हे तर अनुकरण करण्याची गोष्ट आहे. मुलांनी काय वाचावे यावर बंधने आणू नयेत; परंतु चांगल्या साहित्यकृती उपलब्ध करून दिल्या तर मुले नक्कीच आवडीने वाचतात. पालक मुलांना वास्तववादी जगात जगण्यासाठी हतबल करत आहेत, त्यांना कल्पनावादी अनुभव घेऊ देत नाहीत. परंतु मुलांचा सर्वांगिण विकास साधायचा असल्यास त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणे आवश्यक आहे आणि तो वाचनातूनच मिळणार आहे.

पुरस्कार प्राप्त लेखकांच्या वतीने मनोगत व्यक्त करताना कल्पना मलये म्हणाल्या, बालसाहित्यविषयक क्षेत्रात गेली ५० वर्षे कार्य करणाऱ्या मातृसंस्थेकडून पुरस्कार मिळणे ही आनंदाची बाब आहे. बालकांचे भावविश्र्व समजून घेत त्यांच्यासाठी साहित्यकृती निर्माण करणे ही अवघड गोष्ट आहे. शिक्षकांनी अनेक चळवळी, उपक्रमातून विद्यार्थ्यांवर वाचन संस्कार करावेत.

## द्विदशकपूर्तीनिमित्त कनेक्टिंग ट्रस्टतर्फे स्वयंसेवकांसाठी स्नेहमेळाव्याचे आयोजन

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : गेल्या २० वर्षांपासून लोकांच्या मानसिक, भावनिक आरोग्यासाठी आणि समाजात होत असलेल्या आत्महत्या रोखण्यासाठी कनेक्टिंग ट्रस्ट ही पुण्यातील स्वयंसेवी संस्था अविरत कार्य करत आहे. आत्महत्या प्रतिबंधाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या कनेक्टिंग ट्रस्ट संस्थेला यंदा २० वर्ष पूर्ण होत आहेत. संस्थेच्या द्विदशकपूर्तीनिमित्त येत्या २३ ऑगस्ट २०२५ रोजी हितचिंतक व स्वयंसेवकांसाठी स्नेहमेळाव्याचे आयोजन केले आहे. यासह इतरही उपक्रम आयोजिले जाणार आहेत, अशी माहिती कनेक्टिंग ट्रस्टच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रणिता मडकईकर यांनी दिली.

प्रणिता मडकईकर म्हणाल्या, "कनेक्टिंग ट्रस्टचे सर्व प्रकल्प स्वयंसेवकांमार्फत राबविण्यात येतात. अनेक दानशूर मंडळींच्या, संस्थांच्या आणि कंपन्यांच्या अर्थसहाय्यावर हे काम सुरु आहे. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ४ ऑक्टोबर २०२५ रोजी बोमन इराणी यांच्या 'क्लास ऍक्ट' कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. भावनिक आरोग्य आणि आत्महत्या याविषयी जनजागृती व्हावी आणि आत्महत्येमुळे दगावलेल्याना श्रद्धांजली वाहण्यासाठी ११ ऑक्टोबर २०२५ रोजी कँडल मार्च आयोजिला आहे. २८ ते ३० नोव्हेंबर २०२५ दरम्यान आत्महत्या प्रतिबंधातल्या विविध घटकांचा आढावा घेणाऱ्या एका आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. ही परिषद पुण्यात भरवली जाणार असून, आत्महत्या रोखण्याकरीता कार्यरत असलेल्या सामाजिक संस्था, मानसोपचारतज्ज्ञ, सामाजिक संशोधक आणि विद्यार्थी ह्यामध्ये सहभागी होतील. समाजात घडत असलेल्या आत्महत्येच्या घटना रोखण्यासाठी कोणकोणते विधायक पावले उचलता येतील, यावर विचारविनिमय केला जाणार आहे."

## फराटे पाटील महाविद्यालयातील विद्यार्थ्याची आंतरराष्ट्रीय पातळीवर झेप

### बीसीए विभागातील आदर्श डोळस याची सिडनी विद्यापीठात निवड

■ जनप्रवास प्रतिनिधी

मांडवगण फराटा : मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या बीसीए विभागातील विद्यार्थी कु. आदर्श राजेंद्र डोळस याने आंतरराष्ट्रीय शिक्षणात मोठे यश संपादन केले आहे. त्याची ऑस्ट्रेलियामधील सिडनी विद्यापीठात "मास्टर ऑफ कम्प्युटर सायन्स" या नामांकित अभ्यासक्रमासाठी निवड झाली असून, महाराष्ट्र शासनाच्या विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत त्याला एक कोटी वीस लाख रुपये शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे. तसेच हे शिक्षण घेत असताना दर महिना तीन लाख रुपये स्टायपंड देखील मिळणार आहे.

ही शिष्यवृत्ती गुणवत्ता असलेल्या आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील शिक्षणासाठी पात्र विद्यार्थ्यांना दिली जाते.



आदर्श याने अत्युत्तम शैक्षणिक कामगिरी, संशोधन क्षमतेचे प्रदर्शन आणि सामाजिक कार्यातील सहभाग याद्वरे ही शिष्यवृत्ती मिळवली आहे. याबद्दल माहिती देताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव वसंतराव फराटे पाटील म्हणाले की, महाविद्यालयात बी.सी.ए. विभाग २००९ पासून कार्यरत आहे. आजपर्यंत या विभागात शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. परंतु आंतरराष्ट्रीय शिक्षणासाठी महाराष्ट्र शासनाची शिष्यवृत्ती प्राप्त केलेला हा पहिलाच विद्यार्थी आहे.

## रोटरी क्लब ऑफ पिंपरी इलाईट यांच्या मार्फत पिपंरी विद्यालयास मदत

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुरंदर : पुरंदर तालुक्यातील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड संचलित मावडी पिंपरी हायस्कूल पिंपरी या विद्यालयामध्ये रोजी रोटरी क्लब ऑफ पिंपरी इलाईट यांच्या मार्फत विद्यालयामध्ये ६५ इंची दोन एलईडी टीव्ही संच आणि विद्यालयातील काही भौतिक सुविधांमध्ये सुधारणा केली. त्या बद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड या संस्थेचे शैक्षणिक वर्ष २५/२६ या वर्षातील



दिनदर्शिकेचे प्रकाशन,एसएससी परीक्षा मार्च २०२५ मध्ये प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार या निमित्त करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष रोटरी क्लब ऑफ पिंपरी इलाईटचे अध्यक्ष महादेव बापू शेंडकर होते.सी.पी.रोटरीन रविंद्रजी भावे ,सेक्रेटरी रोटरियन सचिन मोरे ,हॅपी व्हिलेज डायरेक्टर विश्वनाथ येरवा, इतर पदाधिकारी, त्याचबरोबर पिंपरी शाखेचे अध्यक्ष प्रकाश मारणे रायचंद गायकवाड,अजित कड,जी व्ही भोंग,एस पी जाधव,जी एम टेकवडे, इतर पदाधिकारी, शिक्षक, ग्रामस्थ उपस्थित होते. या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी कोलते यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि विद्यालयास मदत केल्याबद्दल सर्व मान्यवरांचे आभार मानले.

## नेहरू विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

निरगुडसर : निरगुडसर (ता.आंबेगाव) येथील पं.ज.नेहरू माध्यमिक व द.गो. वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी त्याच्या प्रतिमेला विद्यालयातील सर्व शिक्षकांच्या हस्ते पुष्पहार घालून प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे जेष्ठ प्रा.अरूण



गोरडे व पर्यवेक्षक संतोष वळसे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या कार्याची माहिती दिली. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतामधून लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांची महती सांगितली. साहित्यसम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त विद्यालयामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य कांताराम टाव्हरे यांनी केले. तर सूत्रसंचालन सांस्कृतिक मंडळाचे प्रमूख विनोद बारवकर यांनी केले.आभार विनायक जोशी यांनी मानले._

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

लोणीकंद : शोषित, वंचित, कष्टकरी समाजाच्या वेदना शब्दांत उतरवणारे थोर साहित्यिक, लेखक, कवी व समाज सुधारक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती लोणीकंद (ता. हवेली) येथे उत्साहात साजरी करण्यात आली. सहकार नगर येथे दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडलेल्या या जयंती महोत्सवात सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रेरणादायी कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठाण व हनुमान मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमास सरपंच,उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी, आजी माजी पदाधिकारी, परिसरातील नागरिक, विद्यार्थी, कार्यकर्ते आणि सामाजिक संस्थांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात पहाटे ५ वाजता स्वारगेट येथून अण्णाभाऊ साठे यांची ज्योत आणण्याने झाली. त्यानंतर वृक्षारोपण, साहित्य वितरण,



मान्यवरांचे विशेष मनोगत, आणि अण्णाभाऊ साठे सभागृहाचे लोकार्पण तसेच लोणीकंद जिल्हा परिषद शाळा व डॉ. बसू हायस्कूल शाळेतील ग्रंथालयास पुस्तके दिली आदी उपक्रमांनी जयंतीला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

दुपारी ३ वाजता अमोल गर यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर आधारित विशेष सादरीकरण सादर केले. सायंकाळी ७ वाजता भव्य मिरवणुकीने परिसर दुमदुमून गेला. रात्री ८ ते १० दरम्यान आयोजित भोजन समारंभात ग्रामस्थांनी सामूहिकपणे सहभाग घेतला.तसेच पोलीस प्रशासनाचा चोख बंदोबस्त होता.

या कार्यक्रमाचे प्रमुख आधारस्तंभ म्हणून भाजपा पुणे जिल्हाध्यक्ष प्रदिप कंद यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रेरणेतून संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन यशस्वीपणे पार पडले.

या जयंती उत्सवाच्या निमित्ताने अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांना नवसंजीवनी मिळाली असून, सामाजिक एकता, समतेचा संदेश आणि परिवर्तनाचा मंत्र पुन्हा एकदा लोकांच्या मनात ठसविण्यात आला. साहित्य, संगीत आणि समाजकार्य या त्रिसूत्रीचा संगम असलेल्या या कार्यक्रमाने उपस्थितांमध्ये प्रेरणा आणि ऊर्जा निर्माण केली.

## गावाचा अभिमान असलेल्या सेनानायक यांचे गावकऱ्यांनी केले उत्स्फूर्त स्वागत

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : पुणे जिल्ह्यातील डोणजे गावाचा अभिमान, भारतीय सेना नायक श्री संतोष पायगुडे ह्यांनी २००५ साली भारतीय सैन्यात भरती होऊन तब्बल २० वर्षे देशसेवा केली, श्री पायगुडे ३१ जुलै २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले.

त्याच्या स्वागतासाठी डोणजे आणि आजुबाजू च्या परिसरातील ग्रामस्त एकवटले.सर्व ग्रामस्थांनी मिळून एक विशेष सत्कार केला. " हा केवळ एका सैनिकाचा सन्मान नसून, आपल्या गावाच्या देशभक्ती, त्याग आणि परंपरेचा गौरव आहे." ह्या भावनेने गावकऱ्यांनी पायगुडे यांचे स्वागत केले. सेवा, शौर्य आणि समर्पण भावनेने संतोष पायगुडे यांनी अरुणाचल प्रदेश, आसाम, जम्मू-काश्मीर, दिल्ली, हरियाणा, देहरादून,



पुणे आणि बेलगाव अशा विविध ठिकाणी सैनिकी सेवा बजावली. संतोष पायगुडे ह्यांनी ऑपरेशन सिंदूर सारख्या महत्त्वाच्या मोहिमांमध्ये भाग घेतला. विशेष म्हणजे, त्यांनी भारताच्या सर्वोच्च कमांडो दलात – राष्ट्रीय सुरक्षा गार्ड (NSG) मध्ये ३ वर्षे सेवा देऊन अतिरेकी हल्ले, बंधक मुक्ती, विमान अपहरण अशा अत्यंत धोकादायक मोहिमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या अतुलनीय कर्तृत्वाबद्दल त्यांना COAS Commandation Card (थलसेनाप्रमुखांकडून) NSG प्रशस्तीपत्र मिळाले जे त्यांच्या शौर्याचे आणि निष्ठेचे साक्षीदार आहेत. आजच्या डिजिटल युगात जिथे करिअरचे अनेक पर्याय उपलब्ध असताना, देशासाठी काहीतरी करण्याची, स्वतःच्या पलीकडे जाऊन झगडण्याची प्रेरणा हरवत चालली आहे. अशा वेळी, संतोष पायगुडे यांचे जीवन प्रवास तरुणांसाठी एक जिवंत प्रेरणा आहे.

## दोन वर्षांपूर्वी अपहरण झालेल्या मुलीची सुटका

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : दोन वर्षांपूर्वी अपहरण झालेल्या मुलीचा यशस्वी शोध घेऊन तिची सुटका करण्यात आली. ऑपरेशन मुस्कान अंतर्गत ही कामगिरी राहुरी पोलिसांनी अत्यंत कौशल्याने पूर्ण केली असून गेल्या वर्षभरात त्यांनी एकूण ७३ मुलींचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात दिले आहे.

या बाबत पोलीस सूत्रांनी सांगितलेली माहिती अशी, की राहुरी पोलीस स्टेशन येथे गु.र. नंबर ८७६/२०२३ नुसार, भारतीय दंड विधान कलम ३६३ अंतर्गत दिनांक ११ ऑगस्ट २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात अपहरण झालेल्या मुलीबाबत कोणतीही ठोस माहिती उपलब्ध नसतानाही, गुप्त बातमीदारांच्या मदतीने व तांत्रिक तपासाद्वारे अथक प्रयत्न करून मुलीचा ठावठिकाणा शोधण्यात आला.

पोलीसांनी तपास करत अपहृत मुलीस सुरक्षित राहुरी पोलीस स्टेशनमध्ये आणले आणि नातेवाईकांच्या ताब्यात सुपूर्द केले. या प्रकरणी करण अशोक पवार (वय २३ वर्ष, रा. खुडसरगाव, ता. राहुरी) यास अटक करण्यात आली. पुढील तपास पोलीस उप निरीक्षक राजु जाधव आणि पोलीस कर्मचारी गणेश लिपणे करीत आहेत.

## विनोबा भावे ग्रामविकास प्रतिष्ठानच्या वतीने रणजित राऊत यांचा गौरव

■ जनप्रवास प्रतिनिधी

जामखेड : जैवविविधता संवर्धन, लोकसहभाग, आणि पर्यावरण जागृती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे फक्राबाद, तालुका जामखेड जिल्हा अहिल्यानगर येथील युवा शास्त्रज्ञ व जैवविविधता संशोधक रणजित रावसाहेब राऊत यांचा महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, पंचायत समिती कर्जत व विनोबा भावे ग्रामविकास प्रतिष्ठान, मलठण ता. कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन दिनांक २९ जुलै २०२५ रोजी विशेष सत्कार करण्यात आला.

पंचायत समिती कर्जत येथे आयोजित करण्यात आलेल्या जैवविविधता कायदा २००२




अंमलबजावणी, जैवविविधता व्यवस्थापन समिती व लोक जैवविविधता नोंदवही अद्ययावत करण्यावरील कार्यशाळेच्या निमित्ताने हा सन्मान करण्यात आला. रणजित राऊत यांनी यावेळी "जैवविविधता संरक्षण व संवर्धन: काळाची गरज" या विषयावर प्रभावी मार्गदर्शन करत जैवविविधतेच्या सध्याच्या संकटांवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विनोबा भावे ग्रामविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष पोपट (आबा) खोसे होते. यावेळी महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे कार्यक्रम अधिकारी दौलत वाघमोडे, सहाय्यक वनसंरक्षक रविकांत डेंगरे, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी सुद्रिक साहेब,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विचारमंच, माहिजळगाव चे अध्यक्ष नवनाथ (नाना) शिंदे, ॲड. शरद होले, आकाशवाणी अहिल्यानगर च्या निवेदिका शितल कारंडे आणि अनेक ग्रामसेवक उपस्थित होते.

## संक्षीप्त वृत्त

### भारतातील सर्वात मोठं ब्रँडेड लाईव्ह इव्हेंट, आता कोलकात्यात पोहोचलं

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : हा फ्रेंडशिप डे, हाऊस ऑफ मॅकडॉवेल सोडा यारीला आकाशात आणि रंगमंचावर – नवीन उंचीवर नेत आहे. भारतातील सर्वात मोठा ब्रँडेड लाइव्ह आयपी म्हणून, यारी जॅमने ३६,००० फूट उंचीवर पहिला जॅम आयोजित करून एक ऐतिहासिक क्षण साजरा केला, जिथे किंग आणि कर्मा यांनी एका उड्डाणाचे मैत्रीच्या अविस्मरणीय क्षणात रूपांतर केले. आता ही मैत्रीची सफर कोलकात्याच्या पुढच्या अध्यायात प्रवेश करत आहे. हाऊस ऑफ मॅकडॉवेलच्या सोडाने नेहमीच मैत्रीला केवळ थीम नाही तर भावना म्हणूनही प्राधान्य दिलंय. यारी जॅमच्या प्रत्येक पर्वातून ब्रँड आपल्या मैत्रीवरील बांधिलकीला अधिक बळ देतो ˙ आणि हे सर्व एकत्र आणणारा घटक म्हणजे संगीत.

मुंबईहून कोलकात्याकडे जाणाऱ्या खासगी चार्टर फ्लाइटमध्ये किंग, कर्मा आणि विनोदी कलाकार रवी गुप्ता आणि गुरलीन पन्नू यांनी आकाशात मस्त जॅम करत संगीत, कथा, हसणं आणि दिलखुलास यारीनं भरलेला अनुभव दिला.

### 'जारण' च्या वर्ल्ड डिजिटल प्रीमिअरची घोषणा

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : यंदा ऑगस्ट महिन्यात, झी५–भारतातील अग्रगण्य अति–वैयक्तिकृत (हायपर–पर्सनलाईज्ड), भाषेतील पहिल्या स्ट्रीमिंग मंचावर– 'जारण'सह वर्ल्ड डिजिटल प्रीमिअरसह मराठी भाषेत भयपट प्रदर्शित करण्यात येईल. आपल्या अभिनयाचा विशेष ठसा उमटवणारी गुणी कलाकार अमृता सुभाष हिची भूमिका असणारा, समीक्षकांच्या कौतुकाला पात्र ठरलेला हा भयपट–थरारपट ८ ऑगस्ट रोजी केवळ झी५ वर प्रदर्शित होणार आहे. ए अँड एन सिनेमा एलएलपी आणि ए ३ इव्हेंट्स अँड मीडिया सर्व्हिसेस प्रॉडक्शनच्या सहकार्याने अनीस बझ्मी यांनी सादर केलेले आणि दूरदर्शी लेखक हृषिकेश गुप्ते लिखीत– दिग्दर्शित, जारण खोल दफन केलेल्या रहस्यांनी वेढलेल्या कुटुंबाच्या अस्वस्थ करणाऱ्या जगात प्रेक्षकाना खोलवर घेऊन जाते.


### आयएम सुयोग वाघ यांचा सन्मान



■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : बुद्धिबळ खेळाडू सुयोग वाघने नुकतेच आयएम टायटल पूर्ण केले असून तो अहिल्यानगर जिल्ह्याचा तिसरा आयएम ठरला आहे. या त्याच्या अद्वितीय कामगिरी मुळे अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी त्याचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व नगर येथे झालेल्या राष्ट्रीय पंच परीक्षेत प्रशांत धंगेकर, मनीष जसवानी व देवेंद्र ढोकळे हे राष्ट्रीय पंच झाले. त्यांचा सुद्धा सत्कार या वेळी करण्यात आला यावेळी बुद्धिबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट, डॉ. स्मिता वाघ, डॉ. संजय वाघ, प्रशिक्षक प्रकाश गुजराथी, नवनीत कोठारी, विशाल गुजराथी, दत्ता घाडगे, स्वप्निल भागूरकर आदी बुद्धिबळ प्रेमी, खेळाडू, पालक व कोचेस याप्रसंगी उपस्थित होत.

### दिल्लीगेटला ७ ऑगस्टला भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सव



■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : स्वकुळसाळी समाजाचे आराध्य दैवत असलेल्या भगवान जिव्हेश्वर यांच्या जन्मोत्सवास दिल्लीगेट येथील भगवान जिव्हेश्वर मंदिरात दि ७ ऑगस्ट रोजी साजरा करण्यात येणार आहे,त्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जेष्ठ नेते संजय सागावकर यांनी दिली. दिल्लीगेट परिसरातील जिव्हेश्वर युवक मंडळाच्या वतीने जन्मोत्सवाला २५ वर्षे वर्ष झाले आहे.रौप्य महोत्सवी वर्षात मोठ्या उत्साहात कार्यक्रम करण्यात आले तसे यावर्षी आहेत व मागील वर्षपासून सर्व कार्यक्रमाची धुरा महिला मंडळ सांभाळत आहेत. जन्मोत्सवानिमित्त आजपासून कार्यक्रम सुरु झाले असून ते १० ऑगस्ट पर्यंत चालणार आहेत दररोज दुपारी ४ वा विविध भजनी मंडळांचे कार्यक्रम होणार आहेत व सायंकाळी भगवान जिव्हेश्वर पोथीवाचन होणार आहे

### झी टीव्हीकडून मध्यमवर्गीयांसाठी पावसाळ्यात दिलासा

■ जनप्रवास प्रतिनिधी

मुंबई : पावसाळ्याच्या तडाख्यात सापडलेल्या सामान्य मध्यमवर्गीयांसाठी झी टीव्हीने एक अभिनव आणि हृदयस्पर्शी उपक्रम राबविला आहे. नुकत्याच लोकप्रिय ठरत असलेल्या 'तुम से तुम तक' या मालिकेतील मुख्य अभिनेत्री निहारिका चौक्सीच्या हस्ते मुंबई, दिल्ली आणि लखनऊ या शहरांमध्ये केवळ २ मध्ये रेनकोट वाटप करण्यात आले.

भारतीय मध्यमवर्गीय कुटुंबे ही खर्चाच्या काटकसरीपासून ते महिन्याअखेरच्या जुळवाजुळवीपर्यंत सतत आर्थिक गणितं मांडत असतात. त्यांच्या दृष्टीने २ ची किंमतसुद्धा मोठी असते. 'तुम से तुम तक' मालिकेतील अनु या पात्राच्या संवादातून हे वास्तव अधोरेखित झाले ˋ जर एका कोटीतून दोन रुपये कमी झाले, तर ते एक कोटी राहत नाहीत.

# लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेवुन सुसज्ज स्मशानभुमी उभारणे गरजेचे : पिपाडा

■ जनप्रवास वार्ताहार

राहाता : शहरातील सुंदर, स्वच्छ आणि सुंदर स्मशानभुमी एक मॉडेल ठरली आहे. गावोगावी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेवुन अशी सुंदर आणि सुसज्ज स्मशानभुमी उभारणे गरजेचे आहे. अशी भावना भाजपा नेते डॉ.राजेंद्र पिपाडा यांनी व्यक्त केली.

डॉ.राजेंद्र पिपाडा यांचा दृष्टिकोन सकारात्मक आहे. विकासकाम पुर्ण झाले तरी त्याचे जोपासना आणि संगोपन करण्याची जिद्द ही त्यांच्यातील खऱ्या माणुसकीचे दर्शन घडविते. राहात्याच्या सर्व सोयीसुविधांयुक्त असलेल्या स्मशानभुची कहाणी काही वेगळीच आहे. तिला पालक म्हणुन लाभलेले डॉ. राजेंद्र पिपाडा हे आजही पालक म्हणुन कुठेच कमी पडत नाहीत. स्मशानभुमीतील अत्यंत सुक्ष्म गोष्टींवर पिपाडा यांचे लक्ष असते. प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ.ममता पिपाडा व डॉ.राजेंद्र पिपाडा दाम्पत्यांनी त्यांच्या कार्यकाळात स्मशानभुमीला खऱ्या अर्थाने न्याय मिळुन देण्याचे काम केले. ममता पिपाडा यांच्या पुढाकारतुन स्मशानजोगी कुटुंबाला वनरुम किचन चे घर बांधुन दिले अमरधाम सुंदर झाल्यामुळे स्मशानजोग्याच्या मुलीचे लग्न त्यांनीं स्मशानभुमीतच लावले तसेच त्यांची मुले स्मशनाभुमीत अभ्यास करुन उच्च शिक्षित झाली.




गेल्या ३ दिवसापासुन स्मशानभुमीचा बाहेरील परिसर डांबरीकरण करुन सुशोभित करणे महामार्गावरुन जाणाऱ्या अवजड वाहणांमुळे रस्त्यावरुन माती खचुन ती स्मशानभुमिध्ये जात होती त्यालाही डांबरीकरणाचा थर देवुन माती खाली येणार नाही अशी व्यवस्था केली.

बाहेरील सर्व काट्या खराब झुडपे गवत सर्व काढुन स्वच्छ केले. अमरधामचा बाहेरील व आतील परिसर स्वच्छ केल्यामुळे तेथे प्रसन्नता वाढली. त्याठिकाणी एखादी अभ्यासिका चालु शकते असे वातावरण तयार झाले आहे. स्मशानभूमीत आकर्षक विद्युत पथदिव्यांची उभारणी करण्यात आलेली आहे. त्यानिमित्ताने आज झालेल्या कामाची पाहणी करण्यात आली यावेळी भाजपा नेते डॉ. राजेंद्र पिपाडा,आरपीआयचे नेते दिलीपराव वाघमारे,नरेंद्र पिपाडा,महावीर पिपाडा प्रगतशील शेतकरी शिवाजीराव आनप,मदनलाल पिपाडा,गोरखनाथ पवार,मयूर कुंभकर्ण,मदन तारगे आदी यावेळी उपस्थित होते.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे कार्य तरुणांसाठी प्रेरणादायी – डॉ धनवटे



■ जनप्रवास वार्ताहारा

पुणतांबा : लोकशाहीर , साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा स्वयंशिक्षित म्हणून झालेला प्रवास आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन प्रथम लोकनियुक्त नियुक्त सरपंच डॉ धनंजय धनवटे यांनी केले,

अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती येथील साईनगर, अण्णाभाऊ साठे नगर तसेच ग्रामपंचायत कार्यालयात संपन्न झाली यावेळी अण्णाभाऊंच्या प्रतिमेस उपस्थित त्यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले

डॉ धनवटे म्हणाले जीवनात अनेकदा पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी आणि विचारांना चालना देण्यासाठी वाचन गरजेचे आहे अण्णाभाऊंचा जीवन संघर्ष पाहिला तर त्यांनी पुस्तके वाचण्याआधी समाजाचे वाचन केले होते त्यांच्या विचारांची आज तरुण पिढी सह प्रत्येकाला गरज असल्याचे त्यांनी सांगितले

यावेळी ज्येष्ठ नेते मुरलीधर थोरात , लक्ष्मी माता प्रतिष्ठानचे अध्यक्ष छगन जोगदंड , विजय धनवटे , ग्रामपंचायत सदस्य भूषण वाघ, रामचंद्र पवार, श्याम धनवटे, अनिल नळे , गणेश कारखान्याचे माजी संचालक राजेंद्र थोरात , रवींद्र थोरात , संदीप धनवटे , संतोष जोगदंड , संजय जोगदंड , शाहीर नंदकुमार खरात , गौतम थोरात , चंद्रकांत वाटेकर , जालिंदर इंगळे , भाऊसाहेब केरे, मनसेचे आदित्य घोडेराव , प्रकाश लोंढे , पोपट पवार, अजय जोगदंड , योगेश जोगदंड , लहूजी शक्ती सेनेचे तालुकाध्यक्ष विकास जोगदंड अजय काळे , योगेश जोगदंड आदी उपस्थित होते

## हंगा येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्ताने अभिवादन




■ जनप्रवास प्रतिनिधी

पारनेर : लोकशाहिर अण्णाभाऊ साठे विचारमंच हंगा यांच्या संयुक्त विद्यमाने लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती हंगा (महात्मा फुले डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक) येथे उत्साहात साजरी करण्यात आली.हंगा गावच्या विद्यमान सरपंच सुलोचना राजेंद्र लोंढे,दिपक आण्णा लंके, सामाजिक कार्यकर्ते तथा माजी सरपंच राजेंद्रजी शिंदे,ग्रामसेवक भाऊसाहेब शेटेवाड,माजी सरपंच सविता राजेंद्र अल्हाट,आदी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी दिपक आण्णा लंके, राजेंद्रजी शिंदे,मधुकर पठारे साहेब, संदीप रासकर प्रतिक अल्हाट,सविता अल्हाट,माहि सुर्यवंशी,पुष्पा कुर्हाडे,तनया कुर्हाडे,हारेश सुर्यवंशी,आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

सदर कार्यक्रमात सुपा पोलीस स्टेशनचे संपत खैरे साहेब, झरेकर साहेब, आशा अल्हाट,मंगल अल्हाट,मृणाली सुर्यवंशी, वर्षा सुर्यवंशी,दिपाली सुर्यवंशी, राजेंद्र अल्हाट,साहेबराव अल्हाट, दत्ता नगरे, पोपट नगरे, प्रथमेश अल्हाट आदी उपस्थित होते.

# न्यायालयात वकिलाला मारहाण; वकिल संरक्षण कायदा लागू करण्याची मागणी

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : श्रीरामपूर येथील वरिष्ठ दिवाणी न्यायालयात ३० जुलै २०२५ रोजी एक धक्कादायक घटना घडली असून न्यायालयीन कामकाज सुरू असताना अँड. दिलीप दत्तात्रय औताडे यांच्यावर एका पक्षकाराने थेट कोर्ट हॉलमध्येच हल्ला करत मारहाण केली. या हल्ल्यात अँड. औताडे जखमी झाले असून, या घटनेमुळे न्यायालयीन वकिलांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

अँड. औताडे हे संबंधित प्रकरणात उलट तपासणी करत असताना, पक्षकाराने त्यांच्यावर अचानक हल्ला चढवून जबरदस्त मारहाण केली. ही घटना घडत असताना न्यायालयीन परिसरात मोठी खळबळ उडाली. या घटनेच्या पार्श्वभूमीवर राहुरी येथील वकिल संघाने राहुरी तहसीलदार कार्यलय येथे येवून एकत्र येऊन तहसीलदार नामदेव पाटील यांच्याकडे निवेदन तीव्र निषेध व्यक्त केला आहे. या भ्याड हल्ल्याचा सर्व स्तरांवरून निषेध करत, वकिलांच्या सुरक्षिततेसाठी तात्काळ "वकिल संरक्षण कायदा" लागू करण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. राहुरी वकिल संघाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जर शासन वकिल संरक्षण कायदा लागू करण्यात दिरंगाई करत असेल, तर वकिलांच्या स्वसंरक्षणासाठी शस्त्र परवाने देण्यात यावेत, अशी मागणीही यावेळी राहुरी वकील संघाकडून करण्यात आली.



हा प्रकार म्हणजे न्यायालयीन स्वायत्ततेवर आणि कायदा सुव्यवस्थेवरच आघात असल्याचे वकिलांचे म्हणणे आहे. या घटनेमुळे न्यायालयीन परिसरातील सुरक्षाव्यवस्था आणि कायद्याच्या रक्षणासाठी आवश्यक उपाययोजनां बाबत नव्याने विचार करण्याची गरज आहे.

## बाल विद्या मंदिरात अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : बाल विद्या मंदिर शाळेत साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात विद्यार्थिनी भक्ती खिलारी, साई पाटील, रुद्र दिघे, स्पर्श दंडे, वज्रेश्वरी मोरे यांनी या महान व्यक्तींच्या जीवनकार्यावर सुंदर भाषणे केली.

कार्यक्रमानिमित्त विद्यार्थ्यांना वृक्षांची रोपे वाटप करण्यात आली. प्रास्ताविक श्री. हेंद्रे दत्तात्रेय यांनी, अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षिका सौ. आढाव अलकादेवी, सूत्रसंचालन सौ. बर्डे मीना यांनी केले. मुख्याध्यापक श्री. गुलाब मोरे व शिक्षक वृंद यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला. आभार प्रदर्शन श्री. संदीप रासकर यांनी केले.



## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्यावतीने अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले) वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सिध्दार्थनगर येथील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न देण्याची मागणी करण्यात आली.

या अभिवादन कार्यक्रमासाठी रिपाईचे युवक जिल्हाध्यक्ष अमित काळे, ज्येष्ठ नेते विलास साठे सर, राज्य सचिव अजय साळवे, आयटी सेल जिल्हा संपर्कप्रमुख मंगेश मोकळ, युवक जिल्हा सरचिटणीस दया गजभिये, माजी सरपंच युवराज पाखरे, ग्रामपंचायत सदस्य शनेश्वर पवार, तालुका उपाध्यक्ष अजय पाखरे, युवक शहराध्यक्ष निखिल साळवे, रोहित कांबळे, प्रा. जयंत गायकवाड, नितीन कसबेकर, राहुल साळवे, प्रशांत पवार, प्रविण अडबल्ले आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पारनेर तालुक्यातील ५४ गावांचा डोंगरी विभागात समावेश
# भोयरे गांगर्डा, कडूस गावांवर अन्याय

■ जनप्रवास प्रतिनिधी

पाथर्डी :पारनेर दि.१ पारनेर प्रतिनिधी

पारनेर तालुक्यातील ५४ गावांचा डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत समावेश करण्यात आला आहे. राज्य सरकारच्या उपसचिव नि. भा. खेडकर यांनी शासन निर्णय क्र. डोविका–२०२१, प्र.क्र. ५८/का.१४८१–अ, दि. १३ मार्च २०२४ नुसार ही सुधारित यादी जाहीर केली आहे. यामुळे या गावांतील नागरिकांना शैक्षणिक सवलती आणि नोकरीच्या संधींमध्ये डोंगरी दाखल्याचा लाभ मिळणार आहे.



**डोंगरात राहून डोंगरी सुविधांना मुकणार !**

भोयरे गांगर्डा व कडूस या गावांना तालुक्यात सर्वात जास्त डोंगर दर्या आहेत, या अनेक शासकीय सुविधा उपलब्ध नाही, विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासाठी पायपीट करावी लागते, जिरायती पट्टा असल्याने येथील संपूर्ण शेती पावसावर अवलंबून आहे, याठिकाणी रस्त्याची दुरवस्था झालेली आहे. एवढे असूनही शासन निर्णयात भोयरे गांगर्डा, कडूस हे गावे वगळण्यात आल्याने हे दोन्ही गावे डोंगरी सुविधांना मुकणार आहेत.

भोयरे गांगर्डा, कडूस गावांवर अन्याय ! चहूबाजूंनी डोंगर वेढा असलेल्या भोयरे गांगर्डा व कडूस गावांचा शासन निर्णयात समावेश न केल्याने ग्रामस्थांमधून तीव्र संतापाची लाट निर्माण झाली आहे. हे गवे जिरायती पट्ट्यात असल्याने शासकीय अनेक योजनांपासून वंचित आहेत, तालुक्यातील शेवटचे टोक असलेल्या भोयरे गांगर्डा व कडूस या दोन गावांचा डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत समावेश न झाल्याने खरी गरज असून सुद्धा येथील विद्यार्थी डोंगरी दाखल्यांसह शिक्षण व नोकरीच्या सवलतींना मुकणार आहेत. येथील विकास देखील खुंटणार आहे.

या यादीत भोंद्रे, ढोकी, सांगवी सूर्या, पिंपरी गवळी, वाळवणे बुद्रुक, पिंपरी पठार, धोत्रे बुद्रुक, पठारवाडी, जातेगाव, टाकळी ढोकेश्वर, गटेवाडी, पानोली, नारायण गव्हाण, विरोली, गोरेगाव, वडगाव दर्या, पाडळी दर्या, काकणेवाडी, खडकवाडी, सारोळा आडवाई, रायतळे, पळसपुर, पिंपरी जलसेन, नांदुर पठार, पुणेवाडी, वनकुटे, वडगाव गुंड, म्हसोबा झाप, अक्कलवाडी, राळेगण सिद्धी, मांडवे खुर्द, हत्तलखिंडी, तिखोल, बाभूळवाडे, कळस सावरगाव, डोंगरवाडी, चिंचोली, वारणवाडी, तास, पोखरी, कारेगाव, सिद्धेश्वरवाडी, जाधववाडी, शहांजापूर, गारखिंडी, देसवडे, दरोडी, शेरी कोलदरा यासह ५४ गावांचा समावेश आहे. हा निर्णय या गावांतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सवलती आणि नोकरीच्या संदर्भात महत्त्वाचा ठरणार आहे. डोंगरी दाखल्यांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणात प्राधान्य आणि नोकरीत आरक्षणाचा लाभ मिळेल. यामुळे ग्रामीण भागातील विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, यामुळे त्यांच्या जीवनमानात सुधारणा होईल, अशी आशा व्यक्त केली आहे.

# पोलीस महानिरीक्षक यांच्या हस्ते खुनाचा गुन्हा उघडकीस आणणाऱ्या पोलिसांचा गौरव

■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : श्रीगोंदा तालुक्यातील मुंढेकरवाडी (लिंपणगाव) येथील महिला दि.२९ मे २०२४ रोजी राहत्या घरातून बेपत्ता झाल्याची तक्रार श्रीगोंदा पोलीस ठाण्यात दाखल होती. बेपत्ता महिलेचा तपास सुरू असताना पो.ना ज्ञानदेव भागवत व पो. कॉ मनोज साखरे यांना महिलेच्या नातेवाईकांनी सांगितले की बेपत्ता महिला ही राजेंद्र जगन्नाथ देशमुख याच्या सोबत गेली असा संशय व्यक्त केला होता.



याबाबत सविस्तर वृत्त असे की,श्रीगोंदा तालुक्यातील मुंढेकरवाडी (लिंपणगाव) येथील महिला राहत्या घरातून बेपत्ता झाल्याची तक्रार श्रीगोंदा पोलीस ठाण्यात दाखल होती त्यानुसार श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पो.ना.ज्ञानदेव भागवत व पो. कॉ मनोज साखरे यांनी तपास सुरू केला असताना बेपत्ता महिलेच्या नातेवाईकांनी सांगितले की ही महिला राजेंद्र जगन्नाथ देशमुख व अजून एक इसम यांच्या सोबत गेली त्यानुसार त्या दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी प्रेमसंबंध व जमिनीच्या वादातून बेपत्ता महिलेचा गळा आवळून हातपाय बांधून सातारा नजीक कॅनॉल मध्ये टाकून खून केल्याची कबुली दिली. त्यानंतर सातारा पोलीस स्टेशनला भादिव कलम ३०२, २०१, प्रमाणे गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आल्याने नमुद दोन्ही आरोपींना कोरेगाव पोलीस स्टेशन जि. सातारा यांच्या ताब्यात देण्यात आले होते. याबाबत पोलीस अधिक्षक समीर शेख यांच्याकडून श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पो.ना.ज्ञानदेव भागवत व पो.कॉ.मनोज साखरे यांना २५ हजार रुपये रोख पारितोषक व प्रशस्तीपत्र जाहीर करण्यात आले होते. या उत्कृष्ट कामगिरीबाबत दत्तात्रय कराळे, विशेष पोलीस महानिरीक्षक नाशिक परिक्षेत्र नाशिक, सोमनाथ घार्गे, पोलीस अधिक्षक अहिल्यानगर यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देवुन पोलीस अधिक्षक कार्यालय अहिल्यानगर येथे गौरव करण्यात आला आहे. तसेच श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किरण शिंदे,सपोनि प्रभाकर निकम,पो. उपनिरीक्षक सचिन लिमकर, संपत कन्हेरे,संजय वाघमारे,नंदकुमार भैलुमे तसेच सहकारी अंमलदार यांनी देखील अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत. यापुर्वी मंदीर चोरीच्या गुन्हयात चांगली कामगिरी बाबत पो.ना. ज्ञानदेव भागवत व पो.कॉ.मनोज साखरे यांचा लिंपणगाव ग्रामपंचायत कार्यालय येथेही सन्मान करण्यात आला होता.

# कोपरगावमधून देखील बुद्धिबळाचे ग्रँडमास्टर घडतील : रेणुका कोल्हे

■ जनप्रवास वार्ताहार

पुणतांबा : रणनीती, संयम आणि विचारशक्तीचा कस घेणाऱ्या विवेक कोल्हे खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचं रंगतदार आयोजन कोपरगावात संजीवनी युवा प्रतिष्ठान व कोपरगाव चेस-स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडणार आहे. युवानेते कोल्हे यांच्या प्रेरणेतून होणाऱ्या या स्पर्धेचे हे चौथं वर्ष आहे.




या स्पर्धेचं उद्घाटन संजीवनी महिला बचत गटाच्या अध्यक्षा सौ. रेणुका कोल्हे यांच्या हस्ते संत जनार्दन स्वामी आश्रम (पुणतांबा फाटा) येथे उत्साहात पार पडले.

उद्घाटनप्रसंगी बोलताना सौ. कोल्हे म्हणाल्या, बुद्धिबळ हा खेळ केवळ स्पर्धाच नव्हे, तर विचारशक्तीला धार लावणारा एक मानसिक व्यायाम आहे. आधुनिक काळात तरुणाईला संतुलित निर्णयक्षमता आणि संयम शिकवणारा हा खेळ प्रत्येकाने आत्मसात करावा. या स्पर्धेद्वारे ग्रामीण भागातील खेळाडूंना मोठ्या व्यासपीठावर आपली चमक दाखवण्याची संधी मिळते ही अत्यंत आनंदाची बाब आहे.

कोल्हे यांचे गेल्या चार वर्षांपासून स्पर्धेला मिळणारे सक्रिय पाठबळ, त्यांच्या पुढाकारामुळे कोपरगावातील बुद्धिबळ चळवळीला नवीन दिशा लाभली आहे. स्पर्धेच्या आयोजनात आंतरराष्ट्रीय दर्जाचे नियम, जिल्हा व तालुकास्तरीय बक्षिसांची योजना, तसेच मुलींना स्वतंत्र गट उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यंदा एकूण ६४ रोख व १३२ चषकांचे बक्षिसवाटप करण्यात येणार असून, ११, १४, १९ वर्षांखालील व खुला असा चार गटांमध्ये स्पर्धा पार पडणार आहे.

# भारतीय जनता पार्टी सावेडी मंडलातर्फे मंगळागौरी स्पर्धेचे उद्घाटन

## मंगळागौर खेळ ही महिलांसाठी पर्वणीच : धनश्रीताई विखे पाटील

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : भारतीय संस्कृतीत सण उत्सवाला खूप महत्त्व आहे.भाजपा सावेडी मंडलाने महिलांसाठी एक आदर्श, स्तुत्य असा उपक्रम राबवला आहे. महिलांना खरे तर जुने खेळ दाखवून देण्याची संधी मिळाली असून त्यासाठी त्यांची तंदुरुस्ती देखील महत्वाची ठरणार आहे. मंगळागौर सण हा सर्वांना आनंद देणारा सण आहे.पवित्र श्रावण महिन्यामध्ये मंगळागौर सण साजरा करण्यात येतो.मंगळागौर खेळ ही महिलांसाठी खास पर्वणीच आहे.भारतीय जनता पार्टीचे सावेडी मंडळाच्या वतीने महिलांसाठी मंगळागौर खेळाची स्पर्धा चांगल्या पद्धतीने पार पडत आहे.यामुळे महिलांना प्रोत्साहन मिळणार आहे.असे प्रतिपादन धनश्रीताई विखे पाटील यांनी केले आहे.




सावेडी येथील माऊली सभागृहात भारतीय जनता पार्टी सावेडी मंडलातर्फे महिलांसाठी प्रथमच घेण्यात येत असलेल्या मंगळागौर स्पर्धेचे उद्घाटन धनश्रीताई विखेपाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून थाटात संपन्न झाले.यावेळी भारतीय जनता पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते,माजी जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर,सावेडीचे मंडलाध्यक्ष सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे, ज्येष्ठ नेते वसंत लोढा,महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा प्रियाताई जानवे,माजी नगरसेविका मनीषा बारस्कर-काळे,सावेडी महिला मोर्चा अध्यक्षा रेणुका करंदीकर,सरचिटणीस सचिन पारखी,मयूर बोचुघोळ आदी उपस्थित होते.

# टाकळीभान येथे बिबट्याने पाडला शेळीचा फडशा

■ जनप्रवास प्रतिनिधी

टाकळीभान : श्रीरामपूर तालूक्यातील टाकळीभानसह परिसरात बिबट्याने धुमाकुळ घातला असून दिनांक १ रोजीच्या रात्री बिबट्याने शेळ्यांवर हल्ला करून एका शेळीचा फडशा पाडला तर दुसर्या शेळीला गंभीर जखमी केल्याने खळबळ उडाली असून शेतकरी वर्गात भितीचे वातावरण पसरले आहे




**टाकळीभानसह परिसरात बिबट्यांचा संचार असून या परिसरात बिबट्यांनी हैदोस घातला आहे त्यामुळे शेतकरीवर्ग भयभीत झालेला असल्याने या बिबट्याचा लवकरात लवकर वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी बंदोबस्त करण्यासाठी पिंजरा लावून बिबट्यास जेरबंद करावे अशी मागणी या भागातील शेतकऱ्यांनी केली आहे.**

टाकळीभान येथील शेतकरी रमेश बाबासाहेब कोकणे यांची वाडगाव रस्त्यालगत वस्ती असून वस्तीजवळच मोकळ्या जागेत ते गाया व शेळ्या बांधतात काल दिनांक १ च्या रात्री बिबट्याने वस्तीत प्रवेश करून शेळ्यांवर हल्ला केला या हल्यात एका शेळीचा फडशा पाडला तर दुसर्या शेळीवर हल्ला केला मात्र ही शेळी गंभीर जखमी झाली आहे.

सकाळी उठल्यावर कोकणे यांना बिबट्याने शेळ्यांवर हल्ला केल्याचे दिसून आले. या बाबत कोकणे यांनी वनविभाग अधिकार्यांना ही माहिती दिली असून वनविभागाचे वनरक्षक विलास डगळे व कानडे यांनी घटनास्थळी येवून पंचनामा केला आहे.

# आदिवासी प्रकल्प कार्यालयातील निष्क्रिय अधिकाऱ्यांवर कारवाई करा : पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना आदिवासी विकास प्रकल्प, राजुर येथील निष्क्रिय व कर्तव्य शून्य अधिकारी यांच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत निवेदन देण्यात आले आहे.



छावा ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष विश्वनाथ वाघ यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित महिला अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून छावा ब्रिगेडच्या संस्थापक अध्यक्षांवर खोटे गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न केला होता. या विरोधात अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी व अधिकारी मित्रांनी एकत्र येऊन या प्रकरणी योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई न झाल्यास याबाबत पुढील आंदोलनात्मक भूमिका घेण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हा प्रसिद्ध प्रमुखपदी भगवानराव गायकवाड



■ जनप्रवास प्रतिनिधी

पारनेर : अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हा प्रसिद्ध प्रमुखपदी पारनेर शहरातील संभाजीनगर मधील पत्रकार भगवानराव गायकवाड यांची संगमनेर येथे झालेल्या अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हा बैठकीमध्ये सर्वानुमते एकमताने अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे प्रांत अध्यक्ष तसेच केंद्रीय पदाधिकारी यांचे निर्देशनुसार नियुक्ती करण्यात आली.

यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे प्रांत अध्यक्ष बाळासाहेब औटी, केंद्रीय पदाधिकारी सूर्यकांत पाठक, जिल्हा उपाध्यक्ष अरुण शेवाळे,(सर), सुरेश राहाणे, जिल्हा सचिव दिनेश थोरात, सहसचिव सीताराम बोरुडे, महिला अध्यक्षा अमिता कोहली, माजी जिल्हाध्यक्ष अतुल कुऱ्हाडे, नूतन जिल्हाध्यक्ष शाहूराव औटी (सर), कोषाध्यक्ष डॉ. अप्पासाहेब नरोडे, संघटक बाळासाहेब कोकाटे, रोजगार सृजन प्रमुख पत्रकार दत्तात्रय झगडे, पर्यावरण प्रमुख भाऊ कुलट आदी मान्यवर उपस्थित होते.

# वैयक्तीक आरोग्याची काळजी घेणे काळाची गरज : डॉ.सोनल भालेराव

■ जनप्रवास प्रतिनिधी

टाकळीभान : आजच्या धावपळीच्या युगात प्रत्येकाने वैयक्तिक आरोग्याची काळजी घेणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ . सोनल भालेराव यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या टाकळीभान येथील न्यू इंग्लिश स्कूल व कै. आण्णासाहेब पटारे पाटील कनिष्ठ महाविद्यालयामध्ये गुरुकुल प्रकल्पांतर्गत वैयक्तिक आरोग्य व स्वच्छता या विषयावर आयोजित केलेल्या व्याख्यानात त्या बोलत होत्या. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक आर.एम शिंदे उपस्थित होते.




यावेळी पुढे बोलताना डॉ सोनल भालेराव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी दररोज व्यायाम केला पाहिजे, चांगला संतुलित आहार घेतला पाहिजे. व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे. आरोग्याविषयी येणाऱ्या समस्या आपल्या पालकांना व शिक्षकांना सांगितल्या पाहिजे. असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी व्यासपीठावर पर्यवेक्षक एस.एस जरे, गुरुकुल विभागप्रमुख श्रीमती एन. ए पालवे, संदिप जावळे, श्रीमती एस. बी नलवडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती व्ही. आर जमदाडे यांनी तर आभार एस. पी कोकाटे यांनी व्यक्त केले.

# सरकारी जागेवरील अतिक्रमण होणार नियमनुकूल

## गरीबांच्या घरकुलाचा प्रश्न मार्गी लागणार, शिंदेंच्या लढ्याला यश

■ जनप्रवास प्रतिनिधी

टाकळीभान : वाढत्या लोकसंख्येमुळे सरकारी जागेवरील निवासी अतिक्रमण वाढल्याने गेल्या काही वर्षांपासुन गरीबांना मिळणाऱ्या घरकुलासाठी मालकी हक्काची जागा या अटीमुळे घरकुल मंजुर होवुनही निधी पडुन होता. सामाजिक कार्यकर्ते बापुसाहेब शिंदे यांनी या प्रश्नासाठी पाच दिवस आमरण उपोषण करुन अड. अजित काळे यांच्या मार्फत संभाजीनगर खंडपिठात जनहीत याचिका दाखल केली होती. मात्र नुकताच शासनाने सरकारी जागेवरील घरकुलासाठी ५०० चौरस फुटाची जमिन मोफत देण्याचा निर्णय घेतल्याने शिंदे यांनी उपस्थित केलेला घरकुलाचा प्रश्न निकाली निघणार असल्याने शिंदे यांच्या लढ्याला यश मिळाल्याचे बोलले जात आहे.



**महसुल विभागाकडुन सप्ताह साजरा केला जात असल्याने श्रीरामपुर तहसिलदार मिलिंदकुमार वाघ यांनी टाकळीभान येथे भेट देवुन सरकारी जागेवर गेली कित्येक वर्षे अतिक्रमण करुन वास्तव्यास असलेल्या खळवाडी परीसरातील शासकिय गट नं. २८६, २८७ या गटांची पहाणी केली. यावेळी मंडळाधिकारी, कामगार तलाठी, सामाजिक कार्यकर्ते बापुसाहेब शिंदे, भोकरचे सरपंच पती प्रताप पटारे, भागवत रणनवरे उपस्थित होते. यावेळी तहसिलदार वाघ यांनी निवासी अतिक्रमण नियमानुकुल करण्याबाबत सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या.**

येथील सामाजिक कार्यकर्ते बापुसाहेब शिंदे यांनी गेल्या वर्षी गरीबांचे घरकुलाचे स्वप्न भंग पावत असल्याने सरकारी जमिनीवरील निवासी अतिक्रमण नियमानुकुल करुन घरकुलाचा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री व संबधीत विभागाकडे केली होती. घरकुलांचा प्रश्न प्रतिष्ठेचा करुन शिंदे यांनी तालुक्यातील ग्रामपंचायतीत जागृती केली होती. त्यांच्या या अवाहनाला तालुक्यातील ग्रामपंचायतींनी साथ दिली होती. शिंदे यांनी या प्रमुख मागणीसाठी टाकळीभान मंडळ अधिकारी कार्यालयासमोर ५ दिवस आमरण उपोषण केले होते. माजी आमदार लहु कानडे यांनी या उपोषणाला पाठींबा देवुन विधानसभेत या बाबत प्रश्न उपस्थित करण्याचे आश्वासन देवुन शिंदे यांचे उपोषण सोडले होते. त्यानंतर शिंदे यांनी संभाजीनगर खंडपिठाचे जेष्ठ विधिज्ञ अड. अजित काळे यांच्या मार्फत या संदर्भात जनहीत याचिका दाखल केली होती. खंडपिठात याबाबत कामकाज सुरु होते.

राज्याचे महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतीच सरकारी जागेवरील घरकुलांचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी ५०० चौ.फु. जागा घरकुलासाठी मोफत देणार असल्याची घोषणा करुन त्याबाबतचा जी.आर. काढल्याने सरकारच्या या निर्णयाचे टाकळीभान ग्रामस्थांनी फटाके फोडुन स्वागत केले आहे. निवासी आतिक्रमण निमानुकुल होणार असल्याचा शासन आदेश निघाल्याने सामाजिक कार्यकर्ते बापुसाहेब शिंदे यांच्या लढ्याला यश आल्याच्या प्रतिक्रिया टाकळीभान परीसरात व्यक्त केल्या जात आहेत.

# आ.आशुतोष काळेंच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन

■ जनप्रवास वार्ताहार

कोळपेवाडी : कोपरगाव विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार आशुतोष काळे यांचा सोमवार (दि.०४) रोजी वाढदिवस आहे. वाढदिवसानिमित्त कोपरगाव मतदार संघात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यकर्त्यांच्या शुभेच्छा स्वीकारण्यासाठी आ.आशुतोष काळे महात्मा गांधी जिल्हा चॅरीटेबल ट्रस्ट प्रदर्शन हॉल कोपरगाव येथे उपस्थित राहणार आहेत अशी माहिती त्यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे.

दरवर्षी आ.आशुतोष काळे यांच्या वाढदिवसानिमित्त कोपरगाव मतदार संघात विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्याप्रमाणे याहीवर्षी सामाजिक उपक्रम राबविले जाणार असून सोमवार (दि.०४) रोजी सकाळी ८ .००वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने स्वच्छ, सुंदर कोपरगाव या संकल्पनेतून स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे.



त्याचा प्रारंभ कोपरगाव शहरातील अहिंसा स्तंभ पासून सुरुवात होणार आहे.

या स्वच्छता उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन कोपरगाव राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच कार्यकर्त्यांच्या शुभेच्छा स्वीकारण्यासाठी सकाळी १० ते ०३ या वेळेत आ. आशुतोष काळे महात्मा गांधी जिल्हा चॅरीटेबल ट्रस्ट प्रदर्शन हॉल कोपरगाव येथे उपस्थित राहणार आहेत.

# सुखी संसार आपला आणि सुनेचाही ...

● जेव्हा सासू-सासरे धडधाकट असतात, पैसा मिळवत असतात तेव्हा ते आपल्या सून आणि मुलावर अधिकार गाजवू पाहतात व जेव्हा ते वृद्ध शक्तीहीन होतात तेव्हा ते सून मुलाकडे लाचार होतात. खरे तर पहिला डाव आपला असतो. त्याचवेळी मुलाला विशेषत: सुनेला खालील पद्धतीने जपले तर त्याचे फळ नक्कीच आपल्यालाही चांगले मिळेल.

● सुनेला फक्त स्वातंत्र्यच देऊ नका तर तिच्या गरजाही पाहा. सून पतीसोबत जाऊ इच्छित असेल तर तिला मोकळ्या मनाने मदत करा व मुलगा तिला न्यायला संकोचत असेल तर त्याला म्हणा की, हिला जरा फिरायला घेऊन जा' यामुळे सूनही आपल्याशी सॉफ्ट वागू लागेल.



● सासऱ्यानेही प्रत्येक कामासाठी सुनेला बोलावू नये. स्वत:ची कामे स्वत:च करावीत व मुलाला वैवाहिक जीवनात शांतता राखण्याचा सल्ला देत राहावे. दिवसभर ती खोलीत पडून असते, तुझ्या आईलाच सर्व कामे करावी लागतात, हाका मारुनही ऐकत नाही असे न सांगता, ती अजून लहान आहे, तिला जबाबदाऱ्या कळत नाही. तुझी आई हळूहळू समजावून सांगेल असे म्हणावे.

● सून-मुलात काही कारणांमुळे अबोला वा वाद झाला असेल तर मंथरेची भूमिका न बजावता समजावण्याचा प्रयत्न करावा. बहुतेक सासू-सासरे अशावेळी तटस्थ राहतात ते चुकीचे आहे. सून-मुलीतील वाढती धुसफूस एक दिवस आपल्यालाही घातक ठरु शकते.

● जर आपल्या डावात सून व मुलाला सहकार्य, स्वातंत्र्य दिले, त्यांच्या गरजा भागवल्या, त्यांच्यात संशय निर्माण केला नाही, तर तेही त्यांचा डावर सुरु झाल्यावर त्याच पद्धतीने आपल्याशी वागतील.

● आज आपले पारडे जड असताना आपल्या सूना-मुलाला मानसिक यातन न देता त्यांना खाण्यापिण्याची, झोपण्या-जागण्याची व हिंडण्या-फिरण्याची संपूर्ण सवलत दिलीत तर त्यांच्या आपल्या विषयीच्या भावना पॉझिटिव्ह राहतील व आपला वृद्धापकाळ सुखाचा होईल.

# प्रेमविवाहाचा निर्णय मनापासून हवा



तारुण्यात पहिलं पाऊल पडता क्षणी भिन्नलिंगी आकर्षण वाढू लागतं. अर्थात हे स्वाभाविक आहे. मग, या आकर्षणाचं रूपातरं प्रेमात व्हायला वेळ लागत नाही आणि ही युवा पिढी भावनेत वाहू लागते. मुलगी, त्याला पतीच्या रूपात, तर मुलगा तिला आपल्या पत्नीच्या रूपात पाहू लागतो; पण हे दोघे आपल्या प्रेमाविषयी खरोखरच गंभीर आहेत का ?

दोन मनं जेव्हा एकमेकांच्या प्रेमबंधनात पडतात तेव्हा तो एकमेकांच्यात केवळ गुण पाहू लागतात. त्यांना, अवगुण काही दिसून येत नाहीत. आपल्या प्रियकराविषयी वा प्रेयसीविषयी कुणी एक शब्दही ऐकून घ्यायला तयार होत नाही. मग, ती गोष्ट कितीही गंभीर का असेना ? अशा लोकांना, मग जीवनाच्या एखाद्या वळणावर आपल्या निर्णयाचा पश्चात्ताप होतो; पण तेव्हा वेळ निघून गेलेली असते म्हणून प्रेमविवाह करण्यापूर्वी दोघांनीही गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

प्रेमविवाह काही वाईट नाही; पण तत्पूर्वी आपल्या प्रियकर अथवा प्रेयसीविषयी संपूर्ण माहिती मिळवणे जरुरीचे आहे. यासंदर्भात, जर कुणी सल्ला देत असेल, तर त्याकडे कानाडोळा करून चालणार नाही. त्यावरही गंभीरपणे विचार करायला हवा. उत्साहाच्या भरात एखादा निर्णय घेण्यापेक्षा तो सावधगिरीने घेणे जास्त चांगले.

कित्येकदा असे घडते की, आपण ज्या मुलावर प्रेम करतो आहोत किंवा ज्याला आपण आपला जीवनसाथी बनवत आहोत, तो कुठला कामधंदा करतो की नाही ? यावर मुली साधा विचारही करत नाहीत. मग, मात्र एखाद्या बेरोजगार तरुणाला आपल्या जीवनाच्या जोडीदार बनवून त्या चांगल्याच अडचणीत सापडतात. तेव्हा मात्र पश्चात्ताप करत बसण्याशिवाय हाती काहीच उरलेले नसते.

कित्येकदा, तरुण-तरुणी भावनेच्या आहारी जाऊन निर्णय घेतात; पण विवाहानंतर त्यांच्या डोक्यावरचं प्रेमाचं भूत मात्र केव्हाच उतरलेलं असतं. मग, त्यांच्यात रोज तूतू-मैंमैं सुरू होते. प्रियकर वा प्रेयसीशी विवाह करण्यापूर्वी तो अथवा ती आपल्याला खूश ठेवू शकेल का, यावर विचार करायला हवा. एकमेकांची आवड, सवयी, स्वभाव, संस्कार या बाबतही मनापासून विचार करावा. प्रियकराची कौटुंबिक पार्श्वभूमी आणि आर्थिक स्थितीसुद्धा पाहाणे गरजेचे आहे. लग्न म्हणजे काही बाहुलाबाहुलीचा खेळ नव्हे. ही एक नव्या जीवनाची सुरुवात आहे. इथे उतावीळपणाने नव्हे, तर गंभीर होऊन विचार करायला हवा.

# अव्यावहारिक अपेक्षाच नात्यात तणाव निर्माण करते

असे म्हणतात की नात्यातून गोड अपेक्षा बाळगल्याने त्यातील गोडवा टिकून राहातो; परंतु मानसतज्ज्ञांच्या मते अव्यावहारिक अपेक्षाच सर्वात जास्त मधुर नात्यात तणाव निर्माण करतात. नात्यातील काही कटू सत्य अगोदरपासून माहित असले तर त्यामुळे मन दु:खी होऊ शकते. पण ते माहित झाल्यानंतर त्याबाबत परस्परांत राखायला हवा. अशीच काही कटू सत्याची उदाहरणे-


❍ आपली जोडीदार आपल्या शिवाय इतर एखाद्याचीही स्तुती करु शकतो. त्याच्या सौंदर्यवृष्टीबद्दल कुढण्यात व त्रास करुन घेणे योग्य नव्हे.

❍ जरी आपण दोघे एकमेकांसाठी खास असाल तरी एकमेकांपासून दूर कोठ गेल्यानंतर एकमेकांच्या विचारात गढून जाणे शक्य नसते. पती कामानिमित्त गेला असेल तर काम सोडून पत्नीला फोन करीत राहाणे वा माहेरी गेलेली पत्नी चोवीस तास पतीची आठवण करीत राहाणे शक्य नसते.

❍ हे काही मर्यादिपर्यंत एकमेकांच्या आवडी-निवडीशी तडजोड करणे समजून घेता येते पण त्यासाठी पूर्णपणे नवे रुप घेणे स्वप्नवत वाटते.

❍ याचप्रमाणे आपल्या जोडीदाराने प्रत्येक गोष्ट आपल्याला सांगायलाच हवी हे गरजेपेक्षा जादा ठरते. नात्यात पारदर्शकपणा हवा. हे जरी खरे असले तरी सर्वच गोष्टी सांगाव्यात ही अपेक्षा बाळगू नये.

❍ सर्वांत मोठा गैरसमज म्हणजे वादानंतर मन कोऱ्या पाटीसारखे साफ होते वास्तविक रागात बोललेले कडवट सत्य मनात राहाते.



खासगी जीवनात नाक खुपसणे जरी खपवून घेत असेल तरी यातील अतिरेकामुळे संबंधात कटुपणा येऊ शकतो.

# अनाकर्षण आणि शिळेपणाची कारणे

विनायक-आपर्णाच्या लग्नाला दोनच वर्षे झाली आहेत, पण विनायकला आत्ताच आपल्या संबंधात शिळेपणा वाटू लागला आहे. कालपर्यंत ज्या गोष्टी त्याला आकर्षित करीत होत्या, त्याच त्याला आज निराश व्हायला भाग पाडत आहेत. पूर्वी त्याला आपर्णाच्या सहवास हवाहवासा वाटत असे; पण हल्ली तो काही काळ घराबाहेर राहणेच पसंत करीत आहे. ही समस्या खरं तर फक्त विनायक आपर्णाचीच नाही तर सर्वच विवाहित जोडप्यांना अनुभवावी लागते. एवढेच नव्हे तर अविवाहित वा प्रेम करणाऱ्या जोड्यांमध्येही काळी काळानंतर ही समस्या येते. प्रेमातील या अनाकर्षणाची व शिळेपणाची अनेक कारणे आहेत. ती कारणे समजून घेऊन व टाळून प्रेमात दीर्घकाळ आकर्षण टिकवून ठेवता येऊ शकते.




आपल्या नजरेला दिसणाऱ्या ह्या बाह्य आकर्षणाला भाळूनच आपण प्रेमात पडतो. यात काही शारीरिक सौंदर्य, काही अदा व वागणेही असते. लग्नानंतर पती वा पत्नीत पूर्वीपासून माहित नसलेल्या एकमेकांच्या नव्या सवयी समजतात. या सवयी जोवर नव्या असतात तोवर चांगल्या वाटतात; पण कालांतराने त्या सवयी नकोशा, उबग, वैताग आणणाऱ्या वाटू लागतात व त्यामुळे दोघात ताण-तणाव वाढू लागतो. अशावेळी या सवयीमुळे आपल्या जोडीदाराला त्रास होत असेल तर एकतर त्या सोडायला हव्यात किंवा काही सवयींबाबत समजूतदारपणा दाखवायला हवा.

पती-पत्नी लग्नानंतर एकमेकांकडून काही अपेक्षा करु लागतात. त्यांना वाटते की, आपल्या जोडीदाराने आपल्या गरजा, सवयी ओळखून त्यांना साथ-समर्थन द्यावे. पती जर कामात व्यस्त असेल, तर त्याला वाटते पत्नीने आपली अडचण समजून घेऊन सहकार्य करावे, असे वाटते.

पती-पत्नी लग्नानंतर वा प्रेयसीप्रियकर आपल्या संबंधाच्या सुरुवातीच्या काळात एकमेकांच्या व्यवहार, जीवनशैली व संस्कृतीला आपले सहकार्य व समर्थन देतात; पण हळूहळू ही जीवनशैली वा पार्श्वभूमी तिला अनोळखी वाटू लागतात. कित्येकदा आपापल्या सवयींना चिकटून या जोड्या आपल्या जोडीदाराचा आग्रह स्वीकारु इच्छित नाही व मतभेद, ताणतणाव सुरु होतात, हे मतभेद छोट्या-छोट्या हट्टानेही निर्माण होतात. हे टाळण्यासाठी आपल्या संबंधातील ताजेपणा टिकवून ठेवण्याची गरज असते. आपल्या जोडीदाराचे विचार समजून घेऊन त्यानुसार आपल्या सवयी व्यावहारिक बनवा. खोटा स्वाभिमान टाळून वास्तवता स्वीकारुन संबंधात गोडवा भरावा. सस्तिम 'सारी' हा शब्द आपले संबंध सुगंधित करील. आपल्या जोडीदाराशी एकमेकांच्या आवडीनिवडीवर मनमोकळी चर्चा करा व मनमोकळे राहा.

# आपली त्वचा कांतीमय बनवा



सौंदर्याचे खरे रहस्य आपल्या त्वचेतच दडले आहे. लग्नासारख्या महत्वाच्या प्रसंगी सर्वांच्या नजरा वधूच्या रुपरंगावर खिळलेल्या असतात. म्हणूनच या खास दिवसांत कोमेजणारी कारणे जाणून घ्या व नैसर्गिकरित्या आपली त्वचा कांतिमय बनवा.

🌢 लग्नाच्या गडबडीत आपल्यावरही कामाची ताण पडतो. आपण नोकरदार युवती, असाल तर त्वचेची देखभाल करणे जास्तच कठीण जाते. त्वचेची योग्य देखभाल न झाल्यास त्वचेच्या बाह्य भागावर तेल साठते. आपली त्वचा नियमितपणे क्लीन्जरने स्वच्छ करुन तेलरहित करायला विसरु नका.

🌢 भारतीय जेवणात तेल,तूप तिखटाचा जास्त वापर होत असतो. तेल जास्त असल्यास त्वचेवर जास्त तेल साचते व ते रोमछिद्रे बंद करते. यामुळे त्वचा व्यवस्थित श्वास घेऊ शकत नाही. हे पालेभाज्या व भरपूर पाणी पिण्यावर भर द्या.

🌢 नोकरी शिक्षणाच्या निमित्ताने घराबाहेर पडणाऱ्या तरुणींना प्रदूषणामुळे जास्त त्रास होतो. धूळ-धुराने त्वचा कोमेजते. तरी बाजारात सूर्यकिरणांपासून वाचवणारी सनस्क्रिम बाजारात उपलब्ध असली, तरी उन्हात जाताना छत्री व सनस्क्रीम दोहोंचाही वापर करावा.

🌢 कदाचित आपल्याला माहीत नसेल; परंतु मानसिक तणावाचाही आपल्या त्वचेवर खूप परिणाम होत असतो. लग्नापूर्वींच्या दिवसांत भावी वधू मानसिक तणावामुळे आपल्या त्वचेची रंगत घालवू शकते. यासाठी या दिवसांत नेहमी आनंदी राहण्याचा प्रयत्न करावा. तणाव, उशिरा झोपणे, व्यायाम न करणे इ. चा आपल्या त्वचेवर दुष्परिणाम होत असतो.

🌢 कामाच्या ताणामुळे बऱ्याचदा नको ती औषधे घेतली जातात व त्यामुळे शरीराची रोगप्रतिकारकशक्ती कमी होते. ज्याचा परिणाम आपल्या त्वचेवर होत असतो. यासाठी लग्नापूर्वी रक्त शुद्ध करणारी आयुर्वेदिक आषधे घेऊ शकतो. तसेच बाजारातील कोणत्याही सौंदर्य प्रसाधनाचा वापर त्वचेवर करण्यापूर्वी ते हातामागे वापरुन तपासून पाहावे.

🌢🌢🌢

# आपली भूमिका सक्षम असावी

प्रत्येक क्षेत्रात आघाडीच्या स्थानावरती आपण असावे अशी भावना व त्यादृष्टीने प्रयत्न करणारी एक अन् एक व्यक्ती यशाच्या शिखरापर्यंत पोहचलेली दिसेल. अशा या यशस्वी व्यक्ती सदासर्वकाळ नंबर वन असतात. याच्या विरोधातच विचार करावयाच्या झाल्यास सदैव शेवटी असणाऱ्या व्यक्ती आणि त्यांची मानसिकता यांचा विचार करता या व्यक्ती सदैव पळपुटे धोरण स्वीकारुन स्वत:च्या प्रगतीचा मार्ग बंदीस्त करतात आणि आपल्या प्रगतीला खीळ घालतात म्हणजेच हे जीवनात कधीच नंबर वन होऊ शकत नाहीत. मग ते कोणते का क्षेत्र असेना त्यांचा नंबर वन कधीच होणार नाही. हे लक्षात ठेवून सदैव प्रत्येक व्यक्तीने आपली भूमिका ठामपणाने घेऊन आणि सक्षमपणाने त्याच्याशी प्रयत्न करुन इतरांची भूमिका व त्यासाठी लागणारे प्रयत्न आपण करुन त्यामध्ये बदल केल्यास आणि आपल्या वर्तनामध्ये बदल केल्यास निश्चितपणाने सक्षम अशा पद्धतीचे व्यक्तीमत्व निर्माण होण्यास वेळ लागणार आहे. अनाहूतपणाने आपण प्रथम क्रमांकावरती यावे असे वाटत असेल, तर केवळ वाटून चालणार नाही तर त्याकरिता प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागेल. आणि सदैव ध्येयाकडे लक्ष असावे लागेल. तरच आपण नंबर वन होऊ शकू अन्यथा इतरांनी कोणत्याही बाबतीत सर्वप्रथम आपला विचार करावा व आपल्याला प्राधान्य द्यावे असे प्रत्येकालाच वाटत असते.



आजच्या जमान्यातील प्रत्येक व्यक्ती प्रसिद्धीसाठी हापापलेली आहे. प्रत्येकाला न केलेल्या कामाची आपणच केले असे सांगून उदोउदो करण्याची सवय जडलेली आहे. मात्र आपण केलेले काम हे इतरांनी केले असे जर झाले तर आपल्या मनात आकस निर्माण होतो. मात्र अशा या माणसांना स्वत:चे मोठेपण गाण्यात फार महानता वाटते. अशी माणसे कधीच नंबर वन होऊ शकत नाहीत. कारण यांच्यामध्ये असलेली उणीव ही यांना अगदी शेवटच्या टोकाला म्हणजे शून्यवत बनवेल. इतरांच्या नजरेत सर्वोत्कृष्ट होऊ इच्छित असाल, तर आपण काही गोष्टींकडे विशेष लक्ष द्यायला हवे.

इतरांसमोर स्वत:च्या गुणांचा उदोउदो करु नका. आपले टॅलेंट समोरच्या व्यक्तीला आपोआपच कळेल.

कामात व्यस्त असला, तरी थोडा वेळ आपल्या नातेवाईक, मैत्रिणी व परिजितांसाठी काढायला विसरु नका.

जुन्या मैत्रिणींना विसरु नका व नव्या मैत्रिणींसाठीही मनाची कवाडे उघडी ठेवा. नातेवाईक व मैत्रिणींच्या सुख-दु:खात नेहमी सामील होण्याचा सतत प्रयत्न करा. तसेच आपल्या सुख-दु:खाच्या प्रसंगीही त्यांना बोलवा.

शेजारधर्म उत्तमरित्या पाळा. जर शेजारी कोणी आजारी असेल, तर त्यांना मदत करा. त्यांच्या मुलांशी प्रेमाने बोला.

घरातील नोकर, दुधवाले, पेपरवाले, माळी इ. चे विचार ऐकण्याचा प्रयत्न करा. त्यांच्याशी नोकर म्हणून न वागता माणुसकीच्या नात्याने वागा. त्यांचा त्रास, आजार समजून घ्या. आपल्या समवयस्क व सहकाऱ्यांशी सहकाराने वागायला हवे. एखाद्याने आपल्यावर विश्वासून आपल्याला त्याची एखादी गुप्त गोष्ट सांगितली असेल, तर चुकूनही ती इतरांना सांगू नये. तसेच आपल्या खासगी गोष्टीही सर्वांना सांगत सुटू नये. आपला वेळ खोटे बोलण्यात व परनिंदेत घालवू नये. उलट रिकाम्या वेळेचा सदुपयोग करावा. नेहमी हसतमुखत राहावे. घरी आलेल्या पाहुण्यांशी बोलताना तसेच फोनवर बोलताना आपल्या आवाजात आनंद दिसावा. जेणेकरुन समोरच्या व्यक्तीला वाटावे की, त्यांना भेटून आपण खरोखरच आनंदी झाला आहात. आपले व्यक्तीमत्व उठावदार कसे होईल याला महत्व द्यावे.

# कानाच्या त्रासाबाबत नको कानाडोळा



कमी ऐकू येणे, कान दुखणे वा खाजणे इ. सामान्य समस्या बऱ्याचदा कान वाहण्याच्या समस्येशी निगडित असतात. कानाबाहेर वा आत पाण्यासारखा पातळ पदार्थ वा पू वा रक्त येणे म्हणजेच कान वाहणे होय.

ही समस्या कोणालाही होऊ शकते; पुण मुले, कुपोषित माणसे, तापाचे रुग्ण व जलतरणपटूत याची जास्त शक्यता असते. वायूप्रदूषण, ॲलर्जी, घशाचे विकार, चिकनपोक्स, मक्स व रुबैला सारखे ताप, कुपोषण इ. नी. ही कान वाहण्याची समस्या उद्‌भवू शकते. बऱ्याचदा दातांतील इन्फेक्शन ही त्याचे कारण होऊ शकते.

कानाचा पडदा फाटल्यानंतर दोन प्रकारे संक्रमण होते. पहिले पडद्यात भोक पडणे व दुसरे पडद्यासोबतच मध्यकर्णातील हाडात संक्रमण होणे, कान व मेंदूत एक पातळ हाड असते. जेव्हा पडद्याच्या कडांवर भोक पडते तेव्हा इन्फेक्शन मेस्टाईड येथून रक्तवाहिन्यांव्दारे मेंदू, त्या भोवतीची जाळी, फेशियल नव्हे; व आतील भागापर्यंत पोहोचू शकते.

यामुळे मेंदूला, सूज, चेहऱ्याच्या स्नायूंमध्ये पक्षघात, चक्कर येणे अशा समस्या निर्माण होतात.

जर ॲडीनाईडस वा टॉन्सिल्समुळे इन्फेक्शन असेल, तर ते औषधाव्दारे बरे करता येते. बाह्य कानाला मार लागणे, फोड, पुरळ होणे वा बुरशीमुळे कान वाहण्याची समस्या होते. मध्यकर्ण एका नळीव्दारे नाकामागे व घशाच्या वरील भागाशी जोडलेला असतो. जर औषधाने स्थिती सुधारली नाही, तर इन्फेक्टेड ॲडीनाइड व टॉन्सिल्स ऑपरेशनव्दारे काढले जाते व बाह्य तसेच खाण्याच्या औषधाने कान कोरडा केला जातो. कान पूर्णपणे कोरडा झाल्यानंतरच ऑपरेशनव्दारे पडद्याचे भोक बुजवले जाते, याला टिम्पनो प्लास्टी म्हणतात.

**कान वाहण्याची कारणे**

कोणत्याही प्रकारचे व्हायरस वा बॅक्टीरियल वा फंगल इन्फेक्शन कान वाहण्याचे कारण असू शकते.

नाक व घशात होणाऱ्या सायनस व टॉन्सिल्ससारख्या समस्या मध्य कर्णावर परिणाम करतात. यामध्ये कानात सूज येते. नळी बंद होऊन मध्यभागात एक प्रकारचा द्रवपदार्थ साठू लागतो. दाब वाढल्यावर हा पदार्थ पडद्याला क्षती पोहोचवत बाहेर पडतो. बाळाला व्यवस्थित झोपवून दूध न पाजल्यास मध्यकर्णात इन्फेक्शन होते. बऱ्याच महिला बाळाला कुशीवर झोपवून दूध पाजतात. यामुळे दूध मध्यकर्णात जाऊन इन्फेक्शन निर्माण करते.

# सापांबद्दलचे गैरसमज

सापांबद्दल सर्व जगात आणि विशेषत: भारतात अनेक गैरसमज, अंधविश्वास बाळगणारे लोक आहेत; पण हे समाज शास्त्राने पूर्णपणे मोडीत काढले आहेत. वास्तविक साप हा भित्रा प्राणी आहे; पण त्याला छेडल्यावर तो उग्र होणे स्वाभाविक आहे. साप हिवाळ्यात व उन्हाळ्यात सुस्त होतात आणि बिळातच राहतात. पावसाळ्यात मात्र हे साप बाहेर पडतात. संपूर्ण जगभरात सापांच्या ३०० जाती आहेत आणि त्यापैकी केवळ ४ टक्के जातीच विषारी आहेत. सापांबद्दलचे असणारे गैरसमज इच्छाधारी नागाचा. काहींच्या मते जगातील काही नाग किंवा नागीण मानवीरुप धारण करु शकतात; पण तज्ज्ञांच्या मते अद्याप एकाही नागात असे कोणतेच वैशिष्ट्ये आढळलेले नाही. ज्यामुळे नाग मानवी रुप धारण करु शकेल.



अनेकदा बीन वाजल्यावर साप डोलतो हे खरे आहे; पण त्याचे ते डोलणे आवाजामुळे नसते तर साप बीनच्या आकाराला व हलण्याला घाबरुन बीनच्या दिशेने डोलू लागतो. हे अनेकांना माहीत नसते. सापाला मारल्यावर साप बदला घेतो. असेही मानले जाते. खरे म्हणजे सापाला स्मरणशक्तीच नाही त्यामुळे एखादी घटना त्याला एक दिवसही लक्षात राहू शकत नाही असे असता बदला घेणे शक्यच नाही.

सापाचे दूध पिणे हाही एक गैरसमजच आहे. सपेरे लोक सापाला अनेक दिवस पाणी न पाजता तसेच ठेवतात आणि त्यावेळी लोकांपुढे सापासमोर दूध ठेवताच तो साप त्या दुधाला पाणी समजून पीऊ लागतो. यावरुनच सापाला दूध आवडते असे समजून लोकही सापाला दूध पाजतात. असे अनेक गैरसमजुती लोकांमध्ये आहेत, ज्या बदलणे सापांप्रमाणे मनुष्यच्याही हिताचे आहे.

# लग्न करताना मुलापेक्षा मुलीचे वय कमी असणं खरंच गरजेचं असतं का? योग्य अंतर कोणतं?

लग्न हा प्रत्येकाच्याच आयुष्यातील महत्वाचा भाग असतो. लोक लग्नाचा सोहळा खूप खर्च करून मोठ्या उत्साहात साजरा करतात. अरेंज मॅरेज करताना तर मुलगा मुलीचं वय विचारात घेतलं जातं. मुलीपेक्षा मुलाचे वय जास्त असावे हे असा एक प्रचलित रिवाज आहे.

मुली लवकर वयात येतात, मुलांपेक्षा त्यांची भावनिक समज जास्त चांगली असते, मुलं उशीरा वयात येतात त्यामुळेही मुलापेक्षा मुलीचं वय कमी असावं असं पूर्वी मानलं जात असे. आजही अरेंज मॅरेजमध्ये वधू लहान हवी हे गृहितक आहेच.

नवऱ्याचा अधिकार मोठा, वय मोठं त्यामुळे पत्नीनं पतीचा आदर करावा असा एक समज पूर्वी होता. आजही



अपेक्षा तीच असते. मात्र वयातलं अंतर हे काही परस्पर आदर, प्रेम, सामंजस्य यासाठी पुरेसं नसतं. त्यासाठी नात्यात दोघांना परस्परांचा आदर करावा लागतो, तो करणं आवश्यक आहे.

महिलांच्या रजोवृत्तीच्या वय विचारात घेऊन पत्नी पतीपेक्षा लहान असावी असे पूर्वी मानले जात होते. मात्र आज आपण अनेक जोडपी पाहतो ज्यात पत्नीचे वय पतीपेक्षा जास्त आहे आणि त्यांचा संसार उत्तम सुरु आहे.

पतीपत्नीचं नातं परस्पर प्रेम, सामंजस्य, आदर, कुटूंबात एकमेकांना दिलेला सन्मान, आर्थिक भावनिक आधार आणि मुलांची देखभाल यावर फुलते बहरते. ठरवून लग्न करताना पती-पत्नीच्या वयात कमी अंतर असणं गरजेचं मानलं जातं. मात्र वयाबरोबर अन्य कम्पॅटिबिलीचाही विचार विवाह करताना करायला हवा.

वृद्धावस्थेत एकमेकांच्या आधाराची गरज असते. जीवनाच्या या स्थितीत पत्नीचा सपोर्ट खूप महत्वाचा असतो. वृद्ध दाम्पत्य एकमेकांसाठी आधार बनू शकतात.

एकमेकांना सुखदु:खात साथ, मुलांचं उत्तम पालनपोषण, दोघांनी एकमेकांचा सन्मान करणं आणि नात्यात समतोल असणं ही वैवाहिक सुखासाठी महत्त्वाची गोष्ट आहे.

# स्त्री असो किंवा पुरुष जीवनात या गोष्टी अवश्य कराव्यात



शास्त्रानुसार पाप मनुष्याच्या दु:ख आणि पतनाचे मुख्य कारण तर पुण्य सुख आणि उन्नतीचे कारण आहे. परंतु जीवनातील धावपळीत मनुष्य पाप किंवा पुण्य कर्माचा विचारही करत नाही. याच कारणामुळे मनुष्याला सुख, दु:खाचा सामना करावा लागतो.

प्रत्येक मनुष्याच्या मनामध्ये एक चांगला आणि वाईट गुण लपलेला असतो. शास्त्रामध्ये मन, वचन आणि कर्माशी सबंधित विविध प्रकारचे पाप-पुण्य सांगण्यात आले आहेत, ज्याची माहिती प्रत्येक मनुष्याला नसते. यामुळे या ठिकाणी आम्ही शास्त्रात सांगितलेल्या आठ महत्वाच्या गोष्टी सांगत आहोत. या गोष्टींचे पालन केल्यास स्त्री असो किंवा पुरुष दोघांनाही जीवनात सुख-शांती मिळले.

शास्त्रात लिहिले आहे की...

प्राणाघातान्निवृति: परधनहणे संयम: सत्यवाक्यं

काले शक्तया प्रदानं युवतिजनकथामूकभाव: परेषाम्।

तृष्णास्त्रोतोविभंगो गुरुषु च विनय: सर्वभूतानुकम्पा


सामान्य: सर्वशास्त्रेष्वनुपहतविधि: श्रेयसामेष पन्था:।।

या श्लोकाचा सरळ शब्दातील अर्थ असा आहे की, मनुष्याने आठ गोष्टी मन, वचन आणि व्यवहारामध्ये आचरणात आणाव्यात...

- सत्य बोलणे
- शक्ती आणि वेळेनुसार दान करणे.
- गुरु आणि आपल्यापेक्षा वयाने मोठ्या असणाऱ्या व्यक्तींचा मान-सन्मान करणे.
- सर्वांसाठी मनामध्ये दया भाव ठेवणे.
- मनामध्ये निर्माण होणाऱ्या वासनेवर नियंत्रण ठेवणे.
- परस्त्री किंवा पुरुषाबद्दल वाईट बोलू किंवा ऐकू नये.
- दुसऱ्यांचे धन प्राप्त करण्याच्या भावनेपासून दूर राहणे.
- अहिंसा मार्गावर आपले जीवन असावे.

■■■

# दारावर लावावेत स्वस्तिक किंवा ॐ सारखे शुभ चिन्ह, वास्तूच्या अशाच काही टिप्स



वास्तू शास्त्रामध्ये घरातील सकारात्मकता वाढवण्यासाठी आणि नकारात्मकता नष्ट करण्यासाठी विविध उपाय सांगण्यात आले आहेत. घरामध्ये वास्तू शास्त्रातील नियमांचे पालन केल्यास आपण विविध अडचणींपासून दूर राहू शकतो. मान्यतेनुसार घरात वास्तुदोष असल्यास विविध मानसिक तणावाला सामोरे जावे लागू शकते. उज्जैनचे ज्योतिषाचार्य पं. मनीष शर्मा यांच्यानुसार घराच्या मुख्य दाराचे वास्तूमध्ये विशेष महत्त्व सांगण्यात आले आहे. येथे जाणून घ्या, दाराशी संबंधित काही खास वास्तू टिप्स...


१. मुख्य दरवाजाजवळ कचरा जमा होऊ देऊ नये. येथे स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे अन्यथा घरामध्ये नकारात्मकता प्रवेश करते.

२. सकारात्मकता वाढवण्यासाठी दरवावर स्वस्तिक, ऊँ, श्रीगणेश यासारखे शुभ चिन्ह लावावेत. या चिन्हांच्या प्रभावाने घरातील वातावरण पवित्र राहते.

३. घराच्या मेनगेटवर धातूपासून बनवलेली विंड चाइम लावावी. विंड चाइम वास्तुदोष दूर करण्यासाठी अत्यंत लाभदायक मानली जाते.

४. मेनगेटच्या जवळपास तुळस लावणे अत्यंत शुभ मानले जाते. असे केल्याने घरात प्रवेश करणारी सर्व निगेटिव्ह एनर्जी पॉझिटिव्ह एनर्जीमध्ये बदलते.

# सुखी आणि यशस्वी जीवनासाठी तुमच्या कामी येऊ शकतात भीष्म पितामह यांच्या गोष्टी



महाभारत युद्धामध्ये पितामह भीष्म बाणांच्या शय्येवर असताना पांडव त्यांना भेटण्यासाठी गेले होते. पितामह भीष्म यांनी पांडवांना जीवनात सुख आणि शांती कायम ठेवण्यासाठी काही खास नीती सांगितल्या होत्या. येथे जाणून घ्या, यामधीलच काही खास नीती, ज्यामुळे आपल्या सर्व अडचणी दूर होऊ शकतात...

१. परिवर्तन या सृष्टीचा नियम आहे आणि प्रत्येकाने हे मान्य केले तरच जीवनात सुख-शांती मिळू शकते.

२. जो व्यक्ती आपल्या आई-वडिलांची सेवा करतो त्याला लोक-परलोकात मान-सन्मान मिळतो.

३. एका राजाने आपल्या पुत्र आणि प्रजेमध्ये भेदभाव करू नये.

४. आपल्या गुरूंविषयी मान-सन्मान आणि प्रेम व्यक्तीला श्रेष्ठ बनवू शकते.

५. धर्माचे विविध द्वार आहेत, संत-साधू त्या मार्गाविषयी चर्चा करतात जे त्यांना माहिती आहेत, परंतु सर्व मार्गांचा आधार आत्म संयम आहे.

६. वाईट परिस्थिती या जीवन चक्राचा नियम आहे. वैतागून न जात अशा परिस्थितीचा सामना केला तरच यश प्राप्त होते.

७. सत्य आणि धर्माच्या मार्गावर चालणारी एक लहानशी मुंगीसुद्धा एका हत्तीपेक्षा जास्त शक्तिशाली बनते.

८. जर एखादा महान व्यक्ती अधर्म आणि अन्यायाची मदत करत असेल तर धर्मापुढे त्याला नतमस्तक व्हावेच लागते.

९. सत्तेचे सुख उपभोगण्यासाठी नाही तर कठीण परिश्रम करून समाजाचे कल्याण करण्यासाठी असते.

१०. काळ सर्वात जास्त बलवान आहे, एक क्षणात सर्व परिस्थिती बदलते.

# बेदाणे खा, पण ते खरेदी करताना 'ही' गोष्ट तपासून घ्या, नाहीतर होईल तब्येतीचं नुकसान

सुकामेवा आरोग्यासाठी पोषक असतो. त्यामुळे दररोज थोडा का होईना पण सुकामेवा आपल्या पोटात जायलाच हवा, असं आहारतज्ज्ञ सांगतात. सुकामेव्यामध्ये बेदाणे किंवा लाल मनुका किंवा किसमिस हा एक महत्त्वाचा भाग आहे. बेदाणे खाल्ल्यामुळे शरीरातील लोह, हिमोग्लोबिन वाढण्यास मदत होते. निमियाचा त्रास असेल तर तो कमी होतो. पचनशक्ती उत्तम होण्यास मदत होते. पण असे सगळे फायदे तेव्हाच मिळतील, जेव्हा तुम्ही घेतलेले बेदाणे हे उत्तम दर्जाचे असतील. ते उत्तम दर्जाचे आहेत, हे कसं ओळखावं आणि बेदाणे खरेदी करताना कोणती गोष्ट तपासून घ्यावी, ते पाहा.. बेदाणे खरेदी करताना कोणती गोष्ट तपासून घ्यावी? बेदाणे खाल्यामुळे काय फायदे होतात आणि ते खरेदी करताना कोणत्या गोष्टी तपासून



घ्यायला पाहिजेत, याविषयी माहिती सांगणारा व्हिडिओ आहारतज्ज्ञांनी dcdhyani_naturopathy या इन्स्टाग्राम पेजवर शेअर केला आहे.

यामध्ये ते सांगतात की बेदाणे खरेदी करताना ते लालसर असणं गरजेचं आहे. आकाराने लहान, कच्चे असणारे तसेच खाल्ल्यावर थोडेसे आंबट लागणारे बेदाणे खरेदी करू नका. असे बेदाणे खाल्ल्यास पोटदुखीचा त्रास होऊ शकतो. बेदाणे खाल्ल्यामुळे होणारे फायदे रात्री बेदाणे पाण्यात भिजत घालावेत आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ते खावेत. यामुळे पोट फुगणे, अपचन असा त्रास कमी होतो.

ज्यांच्या शरीरात खूप उष्णता असते किंवा ज्यांना नेहमीच तोंड येते, अशा व्यक्तींनी बेदाणे भिजत घालताना त्या पाण्यात थोडं सैंधव मीठ टाकावं आणि दुसऱ्या दिवशी ते बेदाणे बारीक चावून खावेत. यामुळे अंगातली उष्णता कमी होते आणि लिव्हरच्या आरोग्यासाठीही ते चांगले आहे.

१० ते १५ बेदाणे आणि चमचाभर बडिशेप रात्री पाण्यात भिजत घाला आणि दुसऱ्या दिवशी बेदाणे व बडिशेप एकत्र करून खा. यामुळे ॲसिडीटीचा त्रास कमी होतो.

# बागेची काळजी अशी घ्या

आपल्या घराजवळ बाग किंवा बगीचा असावा, असे सर्वांना वाटते. मात्र शहरांमध्ये जागेअभावी बगीचा शक्य नसतो. बाग शक्य असते. गच्चीवर किंवा खिडकीमध्ये झाडे लावून बाग बनवता येते. मात्र झाडे लावली की संपले, असे नाही. झाडांसह बागेची निगा राखणे सर्वात महत्त्वाचे असते.



झाडांची निगा राखण्याचे अनेक प्रकार आहेत. त्यात महत्त्वाचे म्हणजे रोज न चुकता पाणी घालणे. तसेच आठवड्यातून एकदा झाडांची साफसफाई करून त्यांना कुठल्या किडय़ांचा किंवा रोगाचा प्रादूर्भाव झाला नाही ना, हे पाहणे. गुलाब, टोमॅटो, मिरची, सिमला मिरची, चिनी गुलाब, रातराणी, भेंडी, वांगी या फळे आणि फुलांची रोपे सर्वात लवकर कीटकांना बळी पडतात. या झाडांच्या तुलनेत मोगरा, इंडियन रबर, फर्न्स, पाम, शेवंती, झेंडू, जाई, जुई, काकडी, भोपळा, तोंडली, दोडकी, कारली, पालक, मेथी, कोथिंबीर, कडुलिंब, मनी प्लांट, ओवा, गवती चहा या रोपांना कीड तसेच रोगांचा कमी त्रास होतो. त्यामुळे रोपे आणि झाडांची नीट निगा राखली नाही तर कोणतेही रोप रोगाला बळी पडू शकते.

झाडांना वाढीसाठी पाणी आवश्यक आहे. मात्र अति पाणीही त्यांच्यासाठी मारक ठरू शकते. कुंडीमधून पाण्याचा निचरा न होणे. बाग किंवा कुंडय़ा ठेवलेली जागा ओलसर राहणे. कुंडीखालील भांडय़ाची अस्वच्छता या गोष्टी किडय़ांच्या प्रादूर्भावाला कारणीभूत ठरतात. वेळेवर काळजी घेतली आणि साधे-सोपे उपाय केले तर कुठल्याही कीटकनाशकाचा वापर न करता बागेचे व्यवस्थित रक्षण करता येते. या कीटकांचे निरीक्षण करण्यासाठी घरात एक चांगले बहिर्वक्र भिंग ठेवा. त्यामुळे अतिसूक्ष्म किडय़ांचा शोध घेता येईल. शिवाय त्याचा वेगळा उपयोगही आहे. लहान मुलांना भिंगाद्वारे आपण शास्त्रीय माहिती देऊ शकतो.

टोमॅटो, गुलाब, मिरची, सिमला मिरची आणि वांगी यावर अगदी नेहमी आढळणारा उपद्रवी कीटक म्हणजे मावा. पेरू किंवा पेअर या फळांच्या आकाराचे हे कीटक म्हणजे हालचाल करणारा प्राणी असे समीकरण आपल्या डोक्यात बसलेले असते. लोकरीसारखी किंवा कापसासारखी, पण पावडरी वाढ पुंजक्यांच्या स्वरूपात रोपांच्या पानावर दिसली, तर मावा असण्याची दाट शक्यता असते. त्यांच्यामुळे पाने विद्रुप दिसू लागतात. या माव्यांच्या उत्सर्जनात मधासारखा पदार्थ असतो. त्याला चिकटपणा असतो. त्यामुळे ते पानांवर चिकटून राहते. त्यावर कवके वाढू लागतात आणि रोप अधिकच रोगट होऊन पाने गळू लागतात. रोपांची वाढ खुंटते आणि कळ्या अकाली गळून पडतात. अशी रोपे किंवा चांगली वाढलेली झुडपे पाहता पाहता कोमेजून जातात.


हे मावे हिरव्या रंगाची असतात. पण कधी कधी लाल, तपकिरी, निळ्या किंवा करडय़ा रंगाचे मावेदेखील आढळतात. यांना क्वचितच पंख असतात. ते पानांमध्ये इतके छान दडून बसतात की, अगदी सूक्ष्म निरीक्षण केले तरच ते तिथे आहेत असे समजते. पांढऱ्या माशा हा आणखी एक कीटक. पांढऱ्या माशांचे जीवनचक्र ४ ते ६ आठवडय़ांचे असते. अंडी, कोष आणि कीटक अशा तीन अवस्था त्यांच्या जीवनचक्रात असतात. अळीची अवस्था अत्यंत कमी कालावधीची असते. या माशीच्या माद्या झाडांच्या पानाच्या खालच्या पृष्ठभागावर आपली अंडी घालतात. पानांचे सर्वात जास्त नुकसान या माशीच्या कोषावस्थेत होत असते. या माशादेखील पानांमधील आणि कळ्यांमधील अन्नरस शोषून घेतात. त्यामुळे पाने पिवळी पडतात. बाजारातून गुलाब, झेंडू, शेवंती यांसारखी फुले आणीत असाल तर त्यातून या माशा तुमच्या घरात दाखल होण्याची शक्यता असते.

मावा आणि पांढरी माशी यांसारख्या कीटकांसारखा हा पिठा कीटकदेखील अचानक बागेत अवतरतो आणि सर्व रोपांचे नुकसान करण्याचा विडा उचलतो. इतर कीटकांसारखाच हाही जीवनचक्राच्या अंडी, अळी, कोष आणि प्रौढ अशा चार अवस्था असलेला कीटक आहे. पिठासारखा दिसणारा हा कीटक असतो. पिठासारखी झालेली वाढ कीटकासारखी न वाटता कवक किंवा बुरशी आल्यासारखी वाटते. एकदम छोटा असलेला कीडा सूक्ष्मदर्शक भिंग वापरून आपल्याला दिसू शकतो. नवीन रोपांबरोबर हा येऊ शकतो. मातीतून याचे आगमन होऊ शकते. ज्या कुंडय़ांमधील रोपे या रोगामुळे प्रभावित झाली आहेत, त्यांची पाने हात धुण्याच्या साबणाचे पाणी वापरून धुऊन काढावीत किंवा कापसाच्या बोळ्याने स्वच्छ करावीत.

कडुलिबाच्या तेलाचा फवारा मारावा. स्केल्स आणि स्पायडर (कोळी) कीटक आपल्याकडे फारसे नसतात. पण असले तरी आपण त्यांचे नियंत्रण कीटकनाशकांशिवाय करू शकतो. आपल्याला आपल्या घरातील भाजीपाला पिकविण्यासाठी रासायनिक खतांची आणि कीटकनाशकांची गरज नसते.

# छान छान गोष्टी... राजाने नोकरी केल्यानंतर त्याला समजले माळ्याच्या आनंदाचे कारण

प्राचीन काळी एका राजाच्या राज्यात दुष्काळ पडला. यामुळे त्याला कर मिळाला नाही. राजाला राज्याचा खर्च कसा चालवावा आणि भविष्यात दुष्काळही पडणार नाही, यासाठी काय करावे याची चिंता वाटू लागली. शेजारची राज्य आपल्या राज्यावर आक्रमण करतील अशीही भीती राजाला होती. एकदा त्याने काही मंत्र्यांना त्याच्याविरुद्ध षडयंत्र रचतानासुद्धा पकडले होते.



राजाला या सर्व चिंतेमुळे झोप लावत नव्हती. भूकही कमी झाली होती. शाही जेवणात दररोज वेगवेगळे व्यंजन केले जायचे परंतु राजा दोन-तीन घासच खाऊ शकत होता. राजा आपल्या शाही बागेतील माळ्याला दररोज पाहत होता. तो माळी दररोज चवीने कांदा आणि चटणीसोबत सात-आठ भाकरी खायचा.

राजाच्या गुरूने हे सर्वकाही पाहिले आणि ते राजाला म्हणाले, राजन् तुला नोकरी जास्त चांगली वाटत असेल तर तू माझ्याकडे नोकरी करावी. मी तर आहे साधू त्यामुळे मी आश्रमातच राहणार परंतु हे राज्य चालवण्यासाठी मला एक नोकर पाहिजे. तू पूर्वीप्रमाणे महालात राहा. गादीवर बसून शासन कर, हीच तुझी नोकरी आहे.

कथेची शिकवण

गुरूने राजाला समजावले की, सर्वकाही पूर्वीसारखेच आहे परंतु पूर्वी तू ज्या कामाला ओझे समजे होते आता ते फक्त आपले कर्तव्य समजून करत आहेस.

आपल्याला हे आयुष्य कर्तव्य पूर्ण करण्यासाठी मिळाले आहे. कोणत्याही दडपणाचा ओझ्याखाली दबून जाण्यासाठी मिळाले नाही. काम कोणतेही असो, चिंता ते काम अधिक अवघड बनवते. जे कोणते काम मिळेल ते कर्तव्य समजून करावे.

हे कधीही विसरू नये की, आपण काहीही घेऊन आलो नव्हतो आणि काहीच घेऊन जाणारही नाहीत. ही गोष्ट लक्षात ठेवल्यास तुम्हीही नेहमी सुखी राहू शकता.

■■■

# कन्या राशीच्या लोकांच्या १० खास गोष्टी, कसा राहतो यांचा स्वभाव




ज्या लोकांच्या नावाचे पहिले अक्षर टो, पा, पी, पू, ष, ण, ठ, पे या पो पासून सुरु होते त्यांची राशी कन्या असते. ज्योतिष शास्त्रामध्ये राशीचक्रातील सहावी राशी आहे कन्या. राशीचे चिन्ह हातामध्ये फुल घेतलेली मुलगी असे आहे. या राशीचा स्वामी बुध आहे. उज्जैनचे ज्योतिषाचार्य पं. मनीष शर्मा यांच्यानुसार जाणून घ्या, कन्या राशीच्या लोकांच्या खास गोष्टी...

कन्या राशीच्या व्यक्ती अति महत्त्वाकांक्षी असतात. भावुकही असतात आणि विचार न करता मनाला पटेल ते काम करतात.

या राशीच्या अधिक व्यक्ती संकुचित, लाजऱ्या आणि झिडकारून टाकणाऱ्या असतात.

घर, जमीन आणि सेवा क्षेत्रात या राशीच्या बहुतांश व्यक्ती कार्यरत असतात.

आरोग्याबाबत, पचनक्रिया तसेच पोटासंबंधी आजार या राशीच्या लोकांत पाहायला मिळतात. पायाचे आजार या राशीच्या व्यक्तींमध्ये असतात.

हे आपल्या योग्यतेच्या बळावर उच्चपदापर्यंत पोहचतात. प्रतिकूल परिस्थितीसुद्धा यांना घाबरवू शकत नाही आणि हे चातुर्याने पुढे जात राहतात.

बुध ग्रहाचा प्रभाव यांच्या जीवनावर स्पष्ट दिसून येतो. चांगले गुण, विचारपूर्ण जीवन, बुद्धिमत्ता या राशीच्या लोकांमध्ये पाहण्यास मिळते.

शिक्षण आणि आयुष्यात यश प्राप्त झाल्यामुळे यांच्या स्वभावातील चांगुलपणा कमी होत नाही कारण नम्रता यांचा स्वाभाविक गुण आहे.

यांना विनाकारण क्रोध येत नाही, परंतु कधी आला तर लवकर शांत होत नाही.

हे भाषण देण्यात आणि एखाद्या विषयावर चर्चा करण्यात माहीर असतात. नातेवाईकांकडून यांना विशेष लाभ होत नाही तसेच यांचे वैवाहिक जीवन सामान्य राहत नाही.

यांचे प्रेमसंबंध यशस्वी होत नाहीत. जवळच्या लोकांसोबत यांचे वाद चालूच राहतात.

हे लोक धार्मिक विचारांवर श्रद्धा ठेवणारे असतात. यांना भरपूर प्रवास करावा लागतो आणि हे परदेशात जाण्याचीशी शक्यता राहते.

यांची कोणत्याही व्यक्तीसोबत सहज मैत्री होऊ शकते.

# तुमच्या खोलीत सूर्याची किरणे पडत असतील तर मिळतील हे फायदे

संपूर्ण ब्रह्मांडाचा आधार सूर्य आहे. सूर्याच्या ऊर्जेमुळेच पृथ्वीवर जीवन आहे. अग्नी, वायू, जल, पृथ्वी आणि आकाश या पाच तत्त्वांवर वास्तू आधारित आहे. सूर्यदेवाला अग्नीचा स्वरूप मानण्यात आला आहे, म्हणून वास्तू शास्त्रात सूर्याचा विशेष महत्त्व आहे. तर जाणून घेऊ सूर्याशी निगडित काही सोपे वास्तू उपाय जे आमच्या जीवनात नवीन ऊर्जा भरून देतील.

सूर्योदया अगोदर ब्राह्मुहूर्ताचा वेळ चिंतन-मनन एवं अध्ययनासाठी सर्वश्रेष्ठ मानले गेले आहे. विद्यार्थी वर्गाला या वेळेचा सदुपयोग करायला पाहिजे. ब्राह्ममुहूर्ताचा वेळ असीम ऊर्जेचा भांडार मानला जातो. सूर्योदयावेळेस येणाऱ्या किरणा आरोग्याच्या दृष्टीने सर्वोत्तम मानले गेले आहे. पूर्व दिशेला सूर्याचा निवास स्थान मानला गेला आहे. वास्तुशास्त्रात सूर्योदयाच्या वेळेस घरातील दार आणि खिडक्या उघडे ठेवण्याचा सल्ला देण्यात येतो.

असे म्हटले जाते की ज्या घरात सूर्याचा प्रकाश येत नाही, तेथे डॉक्टरांना जावे लागते. अंधार असलेल्या खोलीत जेथे सूर्याची किरण येत नाही, तेथे राहणाऱ्या लोकांच्या आरोग्यावर विपरीत प्रभाव पडतो. स्वयंपाकघरात आणि स्नानघरात देखील सूर्याचा प्रकाश पोहोचायला पाहिजे अशी व्यवस्था करायला पाहिजे. घरात कृत्रिम प्रकाशाचा वापर कमीत कमी करायला पाहिजे.

**जाहीर नोटीस**

तमाम नागरिकांस या द्वारे सूचित करण्यात येते कि, श्री.प्रकाश कोंडिबा अवचिते रा.पानवली, ता.दौंड, जि.पुणे यांचे वडील नामे कै.कोंडिबा शिवाजी अवचिते यांचा मृत्यु दि.२४/११/२०२२ रोजी मौजे पानवली, ता.दौंड, जि.पुणे या ठिकाणी झाला आहे. याबाबत मृत्यु नोंद केली नसल्यामुळे उपविभागीय अधिकारी दौंड यांचेकडे अर्ज दाखल केलेला आहे. सदर बाबत कुणाचेही तक्रार अथवा हरकती असल्यास सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून उपविभागीय अधिकारी दौंड यांचे कार्यालयात ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावी. सदर मुदतीत हरकत अथवा तक्रार न आल्यास काही म्हणणे नाही, असे समजून तक्रार नाही, यानुसारपुढील कार्यवाही करण्यात येईल.

ठिकाण : केडगांव
दिनांक : १४/०८/२०२४

शिक्का

सही/-
ॲड. भालचंद्र एन.भंडाणे (ॲडव्होकेट व नोटरी)
(ऑफिस : केडगांव सब रजिस्ट्रार ऑफिस समोर, केडगांव, ता.दौंड, जि.पुणे - ४१२२०३)

श्री.प्रकाश कोंडिबा अवचिते
रा.पानवली,ता.दौंड, जि.पुणे
मो.९३०७४७७८७५

# कला विश्व



## 'सत्यभामा' ८ ऑगस्ट रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार

नेहमीच रुपेरी पडद्यावरील कलाकृतींच्या माध्यमातून इतिहासाची पाने उलगडण्याचा प्रयत्न केला जातो. अशा कलाकृती रसिकांना केवळ भूतकाळात नेत नाहीत, तर त्या काळातील वास्तवतेचे दर्शनही घडवतात. बऱ्याचदा त्या काळातील काही चांगल्या-वाईट घटना वर्तमानातील जीवन सुखकर बनवण्यासाठी उपयोगी ठरतात. काही मात्र मनाला चटका लावून जातात. पूर्वीची सती प्रथा आज बंद झाली तरी ती पडद्यावर पाहताना मनाची घालमेल झाल्याशिवाय राहात नाही. याच प्रथेवर आधारलेला 'सत्यभामा' हा मराठी चित्रपट ८ ऑगस्टला महाराष्ट्रभर प्रदर्शित होणार आहे. श्री साई सृष्टी फिल्म्स एलएलपी प्रस्तुत 'सत्यभामा' या चित्रपटाची निर्मिती मनीषा पेखळे, सारंग मनोज, अंकुर सचदेव आणि वीरल दवे यांनी केली आहे. 'सत्यभामा'चे दिग्दर्शन सारंग मनोज आणि अभिजीत झाडगावकर यांनी केले आहे. चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवादलेखन मनीषा पेखळे यांनी केले आहे. प्रियकर-प्रेयसीच्या प्रेमकथेसोबतच यात भाऊ-बहिणीच्याही प्रेमाची गोष्टही आहे. सतीच्या प्रथेत कित्येक निरपराध स्त्रीयांचा बळी जात असल्याचे पाहून नायकाचे मन उद्वीग्न होते आणि त्याला जीवनाचा उद्देश सापडतो. चित्रपटाचा नायक सती प्रथेविरोधात लढा देण्यासाठी जणू क्रांतीची मशाल पेटवतो. त्याच्या संघर्षाची अनोखी कहाणी म्हणजेच 'सत्यभामा' हा चित्रपट आहे. या चित्रपटाने ईस्टर्न युरोप फिल्म फेस्टिव्हल, स्वीडन फिल्म फेस्टिव्हल, जागरण फिल्म फेस्टिव्हल, बर्लिन लिफ्ट-ऑफ फिल्म फेस्टिव्हल अशा देश-विदेशांतील मानाच्या चित्रपट महोत्सवांमध्येही हजेरी लावली आहे. हा चित्रपट प्रेक्षकांना केवळ स्वातंत्र्यपूर्व काळात नेणार नसून, त्या काळातील वातावरण आणि विचारसरणीचेही दर्शन घडविणारा आहे. आज आपण प्रगत तंत्रज्ञानाच्या युगात जगत आहोत. स्त्रियांनाही जगण्याचा समान अधिकार आहे, पण त्या काळातील स्त्रीयांनी जे भोगले ते शत्रूच्याही वाट्याला येऊ नये असे 'सत्यभामा' पाहिल्यावर रसिकांना वाटेल. हा केवळ एक चित्रपट नसून, एक विचार आहे, जो सर्वदूर पोहोचण्याची गरज आहे.

## १३ वर्ष डेट केल्यानंतरही हिना खानने कर्करोगामुळे लवकर लग्न केले नाही

काही महिन्यांपूर्वी हिना खानने रॉकी जयस्वालशी लग्न केले. या जोडप्याने सोशल मीडियावर फोटो शेअर करून चाहत्यांना याबद्दल माहिती दिली. लग्नाचे फोटो समोर आल्यावर सर्वांनाच आश्चर्य वाटले. त्यानंतर लोक वेगवेगळ्या गोष्टींबद्दल बोलू लागले. सुरुवातीला असे म्हटले जात होते की हिना आणि रॉकीने 'पती, पत्नी और पंगा' या शोसाठी लग्न केले होते. त्यानंतर असा दावा करण्यात आला की हिना खान गर्भवती आहे, ज्यामुळे या



जोडप्याने घाईघाईत लग्न केले. आता या संपूर्ण प्रकरणावर अभिनेत्रीने तिची प्रतिक्रिया दिली आहे. हिनाने असेही म्हटले की, लोक काय म्हणतात याची तिला पर्वा नाही. लाईव्ह हिंदुस्तानच्या वृत्तानुसार, हिनाने सांगितले की तिने शोसाठी रॉकीशी लग्न केले नाही. अभिनेत्रीने सांगितले की ती गेल्या वर्षी रॉकीशी लग्न करणार होती, परंतु कर्करोगामुळे ते शक्य झाले नाही. हिनाने सांगितले की, जेव्हा तिला या शोची ऑफर देण्यात आली तेव्हा तिने निर्मात्यांना सांगितले की ती विवाहित नाही आणि तुमच्या शोचे नाव 'पती, पत्नी और पंगा' आहे. अशा परिस्थितीत निर्मात्यांनी सांगितले की, जरी तुम्ही शोमध्ये साखरपुडा केला तरी तुम्ही शोमध्येच राहाल. त्यानंतर हिनाने नाही म्हटले, त्यानंतर तिला बॉयफ्रेंड-गर्लफ्रेंड म्हणून शोसाठी लॉक करण्यात आले. अभिनेत्रीने सांगितले की तिने अचानक लग्नाचा निर्णय घेतला होता. हिनाने असेही सांगितले की जेव्हा तिचे लग्न झाले तेव्हा निर्माते खूप आनंदी होते. लग्नापूर्वी हिना आणि रॉकी यांनी १३ वर्षे एकमेकांना डेट केले आणि जूनमध्ये लग्न करून सर्वांना आश्चर्यचकित केले. हिना आणि रॉकीची लव्हस्टोरी एखाद्या चित्रपटाच्या कथेपेक्षा कमी नाही. २०१२ मध्ये 'ये रिश्ता क्या कहलाता है' या मालिकेच्या सेटवर दोघांची पहिल्यांदा भेट झाली होती. या मालिकेत हिना मुख्य भूमिकेत होती, तर रॉकी हा निर्माता होता. याच मालिकेत काम करता करता दोघं एकमेकांच्या प्रेमात पडले.

# खेळाडूंना अधिकाधिक दर्जेदार व अद्ययावत सुविधा पुरविणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

जनप्रवास : प्रतिनिधी

नागपूर : महाराष्ट्र शासनाने क्रीडा क्षेत्राला कायम प्राधान्य दिले आहे. खेळाडूंना मोठी ध्येय खुणावत असून यासाठी तंत्रशुध्द प्रशिक्षण, सकस आहार, परदेशी प्रशिक्षकांचे मार्गदर्शन या गोष्टी आवश्यक आहे. जागतिक स्तरावरील स्पर्धांमध्ये यश मिळवायचे असल्यास या गोष्टी आवश्यक आहे. खेळाडूंना अधिकाधिक दर्जेदार व अद्ययावत सुविधा पुरविण्यात येत असून दिव्या देशमुखने जागतिक स्पर्धेत मिळविलेले देदीप्यमान यश हे देशातील हजारो मुला-मुलींसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग



आणि महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक बुद्धिबळ स्पर्धा विश्वविजेती ग्रँडमास्टर दिव्या देशमुख हिचा नागरी सत्कार कविवर्य सुरेश भट सभागृह येथे आयोजित करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दिव्याचा सन्मान करीत तीन कोटी रुपयांचे बक्षीस प्रदान करण्यात आले. महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेकडूनही ११ लाख रुपयांचे बक्षिस प्रदान करण्यात आले. तसेच खासदार क्रीडा महोत्सव समितीकडूनही सन्मान करण्यात आला.

क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे, वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आमदार सर्वश्री संदीप जोशी, अभिजित वंजारी, प्रवीण दटके, कृष्णा खोपडे, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष तथा आमदार डॉ. परिणय फुके, क्रीडा विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, क्रीडा व युवक सेवा आयुक्त शीतल तेली-उगले, पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, दिव्याचे वडील डॉ. जितेंद्र देशमुख, आई डॉ. नम्रता देशमुख, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेशी संलग्नित जिल्हा संघटनांचे पदाधिकारी, बुद्धिबळपटू, विद्यार्थी व नागपूरकर मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, दिव्याने कमी वयात लक्ष विचलित न होऊ देत ध्येयावर लक्ष केंद्रीत केले. बुद्धिबळात उत्स्फूर्तता, एकाग्रता आणि सजगता आवश्यक असते. बुद्धिबळ हा खेळ शंभरावर देशात खेळला जातो. त्यामुळे दिव्याने गाठलेले यश मोठे आहे. बुद्धिबळात चीनचे वर्चस्व राहायचे. चीनचे हे वर्चस्व जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत कोनेरू हम्पी आणि दिव्या देशमुख हिने धडक देत मोडून काढले. यात दिव्याने अंतिम फेरीत वयाच्या केवळ १९ व्या वर्षी विजय मिळविला.

# हीरक महोत्सवी राज्य चित्रपट पुरस्कार सोहळ्याचे मुंबईत आयोजन

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : साठच्या दशकात महाराष्ट्रातील मराठी चित्रपट, कलाकार आणि तंत्रज्ञांचा भव्यदिव्य सोहळ्यात यथोचित सन्मान करत वाटचाल सुरू करणाऱ्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांचा हीरक महोत्सवी सोहळा मंगळवार, ५ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता वरळी येथील डोम, एसव्हीपी स्टेडियम येथे होणार आहे.

राज्य चित्रपट पुरस्कारांमध्ये संगीत क्षेत्रातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार २०२५ या पुरस्काराने गजलनवाज भीमराव पांचाळे यांना सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच, २०२४ चा चित्रपती कै. व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार प्रसिध्द दिग्दर्शक, अभिनेते महेश मांजरेकर यांना तर चित्रपती कै. व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार अभिनेत्री मुक्ता बर्वे यांना देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. याचबरोबर २०२४ चा स्व. राज कपूर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांना आणि स्व. राज कपूर विशेष योगदान पुरस्कार अभिनेत्री काजोल यांना दिला जाणार आहे. या प्रतिष्ठित पुरस्कारांबरोबरच छत्रपती शिवाजी महाराज महावारसा पुरस्कार २०२५ या पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून सांस्कृतिक वारसा आणि इतिहास जपणाऱ्या कार्यकर्त्यांचा गौरव या पुरस्काराने करण्यात येणार आहे. याशिवाय, ६० आणि ६१ वे महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारही यावेळी प्रदान केले जाणार आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पुरस्कार सोहळ्याचे वितरण होणार आहे. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांची प्रमुख उपस्थिती असेल.

# मिठी नदी गाळ गैरव्यवहार प्रकरणात मुंबई पोलिसांकडून आरोपपत्र दाखल

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : मिठी नदी गाळ कंत्राटातील ६५ कोटींच्या कथित गैरव्यवहार प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने शुक्रवारी सात हजार पानांचे आरोपपत्र दाखल केले. अटक आरोपी केतन कदम व जय जोशी यांच्याविरोधात आरोपपत्र दाखल करण्यात आले असून ११ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी १५ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली आहे. दरम्यान, न्यायालयाने आरोपपत्राची अद्याप दखल घेतली नसल्याचे सूत्रांनी सांगितले.

गाळ उपसण्याच्या कंत्राटात झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेल्या आरोपपत्रात भारतीय न्याय संहितेतील कलम ४७४ वाढवण्यात आले आहे. महापालिका कंत्राटदारांनी बनावट सामंजस्य करार( एमओयू) सादर केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी ईडीनेही नुकतीच पाच कंत्राटदारांच्या आठ ठिकाणांवर छापे टाकले. या कारवाईत बँक खात्यातील सहा कोटी रुपये गोठवण्यात आले.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत १५ ते १६ साक्षीदारांचे जबाब नोंदवले असून, आरोपींनी निविदांमध्ये गैरव्यवहार केलेल्या ९ कोटी रुपयांच्या रकमेपैकी साडेचार कोटी रुपये आरोपींनी स्वीकारल्याचा आरोप आहे. याप्रकरणी शुक्रवारी आरोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले आहे. पण न्यायालयाने अद्याप त्याची दखल घेतलेली नाही.

# कृषी विभागाने शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून लोकाभिमुख काम करावे : कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पीएम किसान सन्मान निधीचा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : भविष्यात शेतीला निश्चितच चांगले दिवस येणार असून त्यासाठी शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून कृषी विभागाने लोकाभिमुख पद्धतीने कार्यरत रहावे, असे निर्देश राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या २० व्या हप्त्याचे वितरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वाराणसी येथून ऑनलाइन पद्धतीने झाले. यावेळी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून दूरदृष्य प्रणालीद्वारे ते उपस्थित होते. यावेळी घेतलेल्या कृषी विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. कृषी आयुक्त सूरज मांढरे, विभागीय कृषी सहसंचालक दत्तात्रय गवसाने, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे, आत्माचे प्रकल्प संचालक सूरज मडके, विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयातील अधीक्षक कृषी अधिकारी विजयकुमार राऊत, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई, सर व्यवस्थापक संजय शितोळे उपस्थित होते.

यावेळी कृषीमंत्री भरणे यांनी कृषी विभागाची रचना, कृषी विद्यापीठे व त्याअंतर्गत विभाग, संशोधन केंद्रे, महाबीजसह कृषी विभागाच्या अंतर्गत महामंडळे,



कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा, वेगवेगळे विभाग आदींची संक्षिप्त माहिती घेतली. पीक विमा योजना, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (पोकरा), प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (पीएमएफएमई), नमो किसान योजना आदी योजनांची माहिती त्यांनी घेतली. विभागाने सर्व योजना प्रभावीपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचाव्यात आणि त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल होईल या दृष्टीने प्रयत्न करावेत, असे सांगितले.

यावेळी आयुक्त मांढरे यांनी माहिती दिली, 'पीएम किसान सन्मान निधी' योजनेचे राज्यात नोंदणीकृत १ कोटी २३ लाख ९२ हजार लाभार्थी असून २० व्या हप्त्यासाठी ९६ लाख ५१ हजार लाभार्थ्यांच्या खात्यात प्रत्येकी २ हजार रुपयांप्रमाणे एकूण १ हजार ९३० कोटी २३ लाख रुपये रक्कम जमा करण्यात आले आहेत. दरवर्षी तीन हप्त्यात एकूण ६ हजार रुपये जमा करण्यात येतात, असे त्यांनी सांगितले.

# बेकायदा झोपड्यांवर एआयची नजर; मालवणीत प्रायोगिक तत्त्वारील प्रकल्प कार्यान्वित

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : नव्याने उभ्या राहणाऱ्या झोपड्या ही सर्वच नियोजन प्राधिकरणांना डोकेदुखी ठरली असून बेकायदा झोपड्या रोखण्यासाठी आतापर्यंत केले गेलेले प्रयत्न अयशस्वी ठरले आहेत. आता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने एआय अर्थात कृत्रिम प्रज्ञेचा वापर नव्याने उभ्या राहणाऱ्या झोपड्या रोखण्यासाठी करण्याचे ठरविले आहे. प्राधिकरणाने मालवणीत प्रायोगिक तत्त्वावर प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेऊन नव्याने उभ्या राहिलेल्या झोपड्या हुडकून काढून त्यावर कारवाई करण्यासाठी संबंधित नियोजित प्राधिकरणांना माहिती पाठविली जाणार आहे.

नव्याने निर्माण झालेल्या झोपड्या शोधून काढून त्यावर कारवाई करण्यासाठी प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी खास कक्ष स्थापन केला होता. मुख्यमंत्र्यांच्या शंभर दिवसांच्या कार्यक्रमात प्राधिकरणाने ही कल्पना मांडली. त्यानंतर प्राधिकरणावरच याबाबत जबाबदारी सोपविण्यात आली. भास्कराचार्य नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर स्पेस ॲप्लिकेशन्स आणि जिओइन्फॉर्मेटिक्स या संस्थेच्या माध्यमातून आवश्यक ती विदा मिळविण्यात आली आहे. त्यानुसार कृत्रिम प्रज्ञेचा वापर करुन उभे व आडवे चित्र निर्माण करण्यात येऊन सात मुद्दे निश्चित करुन नव्याने कुठलेही बांधकाम उभे राहिले तर त्याची माहिती नोडल अधिकारी म्हणून झोपु प्राधिकरणाला दिली जाणार आहे. त्यानंतर ज्या नियोजन प्राधिकरणाच्या अखत्यारित अतिक्रमित बांधकाम झालेले असेल त्यांच्या नावे आपसूक आदेश निर्माण होणार आहे. संबंधित नियोजन प्राधिकरणाला कारवाईसाठी ही माहिती पाठविली जाईल. कारवाईनंतर त्यांनीच ती माहिती अद्ययावत करावयाची आहे. दर सहा महिन्यांनंतर संपूर्ण परिसराचे छायाचित्र घेऊन ते अद्ययावत केले जाणार आहे, असे प्राधिकरणातील एका अधिकाऱ्याने सांगितले.

# जनतेच्या मनात विश्वास निर्माण करण्यासाठी काम करा : मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

जनप्रवास : प्रतिनिधी

शिर्डी : महसूल हा थेट सर्वसामान्यांच्या जीवनाशी निगडित विभाग आहे. महसुली अधिकारी - कर्मचाऱ्यांनी अधिक संवेदनशीलतेने काम करत जनतेच्या मनात विश्वास निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावा, असे आवाहन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

राहाता येथे महसूल विभागातर्फे आयोजित महसूल सप्ताह - २०२५' या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास माजी मंत्री तथा अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालक आण्णासाहेब म्हस्के पाटील, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरिष वमने, तहसीलदार अमोल मोरे, राहाता नगरपंचायतीचे मुख्याधिकारी वैभव लोंढे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर आदी मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री श्री.विखे पाटील म्हणाले , महसूल मंत्री




असताना महसूल पंधरवड्याची संकल्पना प्रथम राबवण्यात आली होती. त्याअंतर्गत सैनिक हो तुमच्यासाठी' सारख्या नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे सैनिकांचे प्रश्न सोडविण्यात आले. खंडकऱ्यांच्या जमिनीचे प्रश्न मार्गी लागले. शेती महामंडळाच्या जमिनी विविध शासकीय उपक्रमांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या. गायरान जमिनींचा वापर घरकुलांसाठी करण्यात आला. तसेच भोगवटा २ मधील नोंदी भोगवटा १ मध्ये करण्यात आल्या. महसूल सेवा अधिक सुलभ व पारदर्शक करण्यासाठी त्या ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करण्यात आल्या.नैसर्गिक आपत्तीच्या काळात महसूल कर्मचारीच नागरिकांना सर्वप्रथम मदत करण्यासाठी धाव घेतो. त्यामुळे या विभागाचे कार्य अधिक महत्त्वाचे आहे.

# जागे राहा, सतर्क राहा, महाराष्ट्र विकला जाऊ देऊ नका; मनसे प्रमुख राज ठाकरेंचं जनतेला आवाहन



जनप्रवास : प्रतिनिधी

पनवेल : विकत घेता येणारी माणसे अशी प्रतिमा आपली महाराष्ट्राबाहेर उभी करण्यात येत आहे. मराठी माणसं विकाऊ आहे असं सांगितले जाते त्याची लाज वाटते. महाराष्ट्रात आपण आपली भाषा विसरतोय, आपली तत्वे घालवतोय, जमिनी घालवतोय. स्वाभिमानी माणसे विकली गेली तर जिवंत प्रेते उरतात. देशाला दिशा देणारा हा महाराष्ट्र आहे. तुम्ही मोठे झाले पाहिजे, पण महाराष्ट्र विकून नाही. इतरांच्या आहारी जाऊन जमिनी देऊन टाकायच्या, बाहेरची माणसे येतायेत. जागे राहा, सतर्क राहा, महाराष्ट्र विकला जाऊ देऊ नका अशी कळकळीचं आवाहन मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी जनतेला केले आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या ७८ व्या वर्धापन दिनी राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

राज ठाकरे म्हणाले की, शेकापच्या व्यासपीठावर मी दुसऱ्यांदा येतोय. पक्षाचा विचार न करता मराठीचा मुद्दा समजून घेतला पाहिजे. जेव्हा जेव्हा चांगले रस्ते आले आहेत तेव्हा राज्य सरकारचे लक्ष नसेल तर तो प्रदेश बर्बाद व्हायला वेळ लागत नाही. महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री महाराष्ट्रात लहान मुलांना हिंदी कशी आणता येईल, शिकवता येईल याचा विचार करतोय. महाराष्ट्रात कामधंदा करायला जे येतायेत त्यांना मराठी कशी येईल याचा विचार करत नाही. महाराष्ट्रातला मराठी माणूस, भूमिपूत्र याचा विचारच राज्य सरकारला नाही. याचे भीषण वास्तव रायगड जिल्ह्यात आहे. रायगडातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी चालल्या आहेत. कुठे चालल्यात माहिती नाही. जमिनीचे व्यवहार करणारे आपलेच, कुंपनच शेत खातायेत. उद्योगधंदे इथे येतायेत आणि लोक बाहेरून आणले जातील. शेतकरी आणि कामगार दोन्ही उद्ध्वस्त होतोय. रायगड जिल्ह्याची जबाबदारी जयंत पाटील यांनी हाती घेतली पाहिजे. इथला मराठी माणूस, इथला शेतकरी, उद्योगधंदे यावर मराठी माणसाने लक्ष ठेवणे गरजेचे आहे असं त्यांनी सांगितले.

तसेच देशाचे पंतप्रधान, गृहमंत्री दोघेही गुजरातचे आहेत. अमित शाह स्वत: एका मुलाखतीत मी गुजराती आहे, हिंदी भाषिक नाही असं सांगतात. महाराष्ट्रातले अनेक प्रकल्प आज गुजरातला जातायेत. प्रत्येकाला आपल्या राज्याबद्दल प्रेम असते मग आम्ही संकुचित कसे? हिंदी गुजरातमध्ये सक्तीची नाही मग महाराष्ट्रात का? भाषा संपली आणि जमीन गेली की जगाच्या पाठीवर तुम्हाला कसलेही स्थान नाही. गुजरातमध्ये कायद्यानुसार जे गुजराती नाहीत, अधिवासी भारतीयांना थेट शेत जमीन विकत घेता येत नाही. ज्या राज्याचे पंतप्रधान, गृहमंत्री गुजरातचे आहेत, तिथली शेतजमीन भारतातील कुठलाही नागरीक विकत घेऊ शकत नाही. जर जमीन विकत घ्यायची असेल तर एक विशिष्ट कायदा आहे त्यानुसार परवानगी घ्यावी लागते. आज आपल्याकडे कुणीही जमीन विकत घेतंय. आमचेच लोक जमिनी विकतायेत. यातून आपणच संपणार हे आपल्या लोकांच्या लक्षात येत नाही अशी खंत राज ठाकरे यांनी व्यक्त केली. दरम्यान, आज सर्वाधिक डान्सबार रायगड जिल्ह्यात कसे?, रायगड जिल्हा ही शिवछत्रपतींची राजधानी आहे. कल्याणच्या सूभेदाराची सून खणानारळाने ओटी भरणाऱ्या आपल्या राजा शिवछत्रपतींची राजधानी इथे आहे तिथे डान्सबार सुरू आहे.




✲ संपादक – संजय प्रल्हाद भोकरे ✲ सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. एम्बसी सेंटर, प्लॉट नं. २०७, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई, ४०००२१. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०-२५४२४२३२ E-mail : sanjmaha@gmail.com